अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. १ एप्रिल २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १८२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## गुजरातचा चेन्नईवर विजय

**अहमदाबाद** : शुभमन गिलच्या अर्धशतकानंतर राशिद खान याने दिलेल्या फिनिशिंग टचच्या जोरावर गुजरातने चेन्नईचा पाच विकेटने पराभव केला. शुभमन गिल याने ६३ धावांची अर्धशतकी खेळी केली. त्यानंतर मोक्याच्या क्षणी राशिद खान याने तीन चेंडूत १० धावांची खेळी केली. गुजरातने चेन्नईचा दहा विकेटने पराभव केला. चेन्नईने दिलेले १७९ धावांचे आव्हान गुजरातने चार चेंडू आणि पाच विकेट राखून पार केले.

चेन्नईकडून राजवर्धन हंगार्केकर याने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या. तुषार देशपांडे आणि जाडेजा यांनी प्रत्येकी एक एक विकेट घेतली. गुजरातचा हा चेन्नईविरोधातील सलग तिसरा विजय होय. गेल्या हंगामात गुजरातने चेन्नईचा दोन वेळा पराभव केला होता. त्यानंतर १६ व्या हंगामाची सुरुवातही गुजरातने विजयाने केली आहे. गुजरातचा सलामी फलंदाज शुभमन गिल याने ६३ धावांची खेळी केली.चेन्नईचा इम्पॅक्ट प्लेअर तुषार देशपांडे याने गिल याला बाद केले.

**सामना क्र.०२**

Punjab Kings Vs Kolkata Knight Riders

किंग्ज इलेव्हन पंजाब विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : ३.३० वा.
स्थळ : मोहाली

**सामना क्र.०३**

Lucknow Super Giants Vs Delhi Capitals

लखनौ सुपरजायंट् विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स्

वेळ : ७.३० वा.
स्थळ : लखनौ

# बिनपगारी गुरूजींची झेडपीत गर्दी, आवरायला आली खाकी वर्दी

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

**स्वत:च्या पोटाला चिमटा देऊन नव्हे तर स्वत:चे पोटच रिकामे ठेवून विद्यादानाचे पवित्र कार्य करणारे शिक्षक अर्थात बिनपगारी गुरूजींची टप्पा अनुदानासाठी गेल्या तीन दिवसांपासून जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात गर्दी होत आहे. शुक्रवारी शेवटच्या दिवशी तर याच गुरूजींची गर्दी इतकी वाढली की या तुडुंब गर्दीला आवरण्यासाठी शिक्षण विभागात चक्क खाकी वर्दी आली. त्याचवेळी 'वजन' ठेवल्याशिवाय कोणाचीच 'फाईल' पुढे सरकत नसल्याचा जुनाच नियम सक्तीने लागू केला असल्याची तक्रारही याच गुरूजींनी चक्क पोलिसांसमोरच बोलून दाखवली. मात्र अशी तक्रार करणाऱ्या गुरूजींसह सगळ्यांना पोलीस कार्यालयाबाहेर काढत असल्याचे चित्र शुक्रवारी सायंकाळी दिसून आले.**

जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये गेल्या १० ते १५ वर्षांपासून अनेक शिक्षक विनाअनुदानित शाळांवर काम करीत आहेत. आज ना उद्या शाळांना अनुदान मिळेल आणि आपला पगार सुरू होईल; या आशेवर हे शिक्षक बिनपगारी काम करत आहेत. शाळांना अनुदान मिळावे आणि आणि आपला पगार सुरू व्हावा; यासाठी अशा शिक्षकांनी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करत मोठा लढा उभारला. त्या लढ्याची दखल राज्य शासनाने घेतल्यामुळे अशा अनुदानित शाळा आणि तेथील शिक्षकांना टप्पा अनुदान शासनाने मंजूर केले आहे. त्याच टप्पा अनुदानाचा प्रस्ताव मंजूर करून घेण्यासाठी गेल्या चार-पाच दिवसांपासून हे बिनपगारी शिक्षक माध्यमिक शिक्षण विभागात हेलपाटे मारत आहेत. मार्चअखेर हे प्रस्ताव मंजूर करून घेणे आवश्यक असल्यामुळे मार्चच्या शेवटच्या दिवशी अशा शिक्षकांनी शिक्षण विभागात गर्दी केली होती. हीच गर्दी हटवण्यासाठी प्रशासनाने शेवटी पोलिसांना पाचारण केले.



### वजन ठेवल्यास त्रुटी गायब

गर्दीतील अनेक शिक्षकांनी वजन आणि गतीचा वेगळाच नियम शिक्षण विभागात लागू असल्याचे सांगितले. ज्या फाईलीवर वजन ठेवले जाते; त्या फाईलीतील त्रुटी गायब होतात आणि फाईलीला वेग मिळतो. हा नियम उघडपणे लावला जात आहे; असेही काही शिक्षकांनी सांगितले. मुळातच पगार नाही तर फाईलीवर वजन कसे ठेवायचे? आणि वजन नाही ठेवल्यास फाईल पुढे कशी सरकेल? या विवंचनेत हे शिक्षक आहेत.

### त्रुटींमुळे उडाली त्रेधातिरपीट

माध्यमिक शिक्षणाधिकारी सुलभा वटारे यांनी टप्पा अनुदान देण्यापूर्वी टप्पा अनुदान पात्र शाळांमधील अनेक त्रुटी काढल्या आहेत. या त्रुटींची पूर्तता करण्यासाठी संबंधित कागदपत्रे जमवता जमवता संस्थाचालक आणि शिक्षकांची अक्षरश: तारांबळ उडत आहे. त्या त्रुटीमुळे तर सर्वांची तारांबळ उडाली. शुक्रवारी शिक्षण विभागात एवढा गोंधळ उडाला की, पोलिसांना बंदोबस्तासाठी यावे लागले. पोलिसांना ही शिक्षक आवरेना असे चित्र होते.

### शिक्षक अक्षरश: रडताहेत

शिक्षण विभागतील कर्मचारी शिक्षकांना कोणत्याही प्रकारे सहकार्याची वागणूक देत नाहीत. प्रत्येकवेळी अपमानास्पद बोलणी ऐकवली जातात. एका फाईलीमधली एकच त्रुटी एकावेळी सांगितली जाते. ती दुरुस्त केल्यानंतर पुन्हा दुसरी त्रुटी दाखवून संबंधित शिक्षकाला परत पाठवले जाते. एकीकडे शाळा सांभाळून दुसरीकडे शिक्षण विभागात हेलपाटे मारून वैतागलेले शिक्षक अक्षरश: रडत असल्याचे चित्र शुक्रवारी पाहण्यास मिळाले.

### शिक्षणाधिकाऱ्यांच्या आदेशाला ठरवले बोगस

यापूर्वी २० टक्के अनुदानासाठी ज्या शिक्षकांना पूर्वीच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी पात्र ठरवले होते; तेच शिक्षक आता ४० टक्के अनुदानासाठी प्रस्ताव घेऊन आल्यानंतर त्यांना पूर्वीच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेले आदेश बोगस असल्याचे सांगितले गेले. त्यामुळे ते शिक्षक अक्षरश: हादरून गेले आहेत. पूर्वीच्या शिक्षणाधिकाऱ्यांनी दिलेले आदेश बोगस कसे असू शकतात? याचा उलगडा न झाल्यामुळे ते हवालदिल झाले आहेत.

## सातवेळा निवडून आलेले माजी खासदार थोरातांचे निधन

**सोलापूर** : काँग्रेसचे माजी खासदार संदीपान थोरात यांचे शुक्रवारी उपचारादरम्यान सोलापुरात निधन झाले. थोरात हे पंढरपूर लोकसभा मतदारसंघातून तब्बल सात वेळा निवडून आले होते. थोरात यांच्या पश्चात त्यांच्या पत्नी सखुबाई, चार मुलगे आणि तीन मुली असा परिवार आहे.



संदीपान थोरात यांच्यावर सोलापुरातील खासगी रुग्णालयात गेल्या काही दिवसांपासून उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान आज त्यांची प्राणज्योत मालवली. सुशीलकुमार शिंदे यांनीही ११ मार्च रोजी सोलापुरातील खासगी रुग्णालयात रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्रकृतीची अस्थेवाईकपणे चर्चा केली होती. संदीपान थोरात हे पंढरपूर राखीव लोकसभा मतदारसंघातून सात वेळा खासदार म्हणून लोकसभेवर निवडून आले होते. संदिपान थोरात हे १९७७ ते १९९९ या कालावधीत पंढरपूरचे सलग सात वेळा खासदार होते. गांधी कुटुंबीयांशी एकनिष्ठ म्हणून थोरात प्रचलित होते.पंढरपूर हा काँग्रेसचा बालेकिल्ला बनविण्यात थोरातांचा स्वभाव आणि त्यांचे राजकारण महत्वाचे मानले जाते. संदीपान थोरात हे शेवटपर्यंत गांधी परिवाराशी एकनिष्ठ राहिले.

## यंदा दहा दिवसांची भीमजयंती

**सोलापूर** : सोलापूर शहरात दहा दिवसाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव करण्याचा निर्णय घेण्यात आला. १३ एप्रिल रोजी रात्री बारा वाजता महामानव डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेची प्रतिष्ठापना होईल त्यानंतर २३ एप्रिल रविवार रोजी भीम जयंतीची मिरवणूक काढण्याचा निर्णय झाल्याची माहिती राजाभाऊ सरवदे यांनी दिली. विश्वभुषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती मध्यवर्ती उत्सव व विश्वस्त समितीची नियोजन बैठक गुरुवारी डॉक्टर आंबेडकर मेमोरियल हायस्कूलच्या मैदानावर पार पडली.



या बैठकीत जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी शिवम सोनकांबळे यांची निवड करण्यात आली, तसेच त्याचबरोबर सरचिटणीस अंकुश मडीखांबे, खजिनदार रवींद्र कदम, ऑडीटर प्रवीण कांबळे, कार्याध्यक्ष वैशाली उबाळे यांच्या निवडी झाल्या आहेत. सुभान बनसोडे, राहुल सरवदे, राजा इंगळे, रवी गायकवाड, ॲड. संजीव सदाफुले, सुबोध वाघमोडे, अजित गायकवाड, प्रवीण निकाळजे, सुशील सरवदे, शशी कांबळे, राजा कदम, अंजना गायकवाड उपस्थित होते.




## साठवण क्षमता वाढवल्याशिवाय रोज पाणीपुरवठा शक्य नाही

▸ आयुक्त शीतल तेली-उगले स्पष्टीकरण



**सोलापूर** : सोलापूर शहराला विविध भागात चार दिवसाआड सध्या पाणीपुरवठा होतो. शहराची घनता कमी आहे. पाण्याची साठवण क्षमताही कमी आहे. भविष्यात साठवण क्षमता वाढविल्यास तसेच उजनीतून १७० एमएलडी पाणी आल्यानंतर पाणीपुरवठा एक दिवसाने कमी होईल तर काही भागात दोन दिवस कमी होऊ शकतील. तूर्तास तरी रोज किंवा दोन दिवसाआड पाणीपुरवठा शक्य नाही, असे स्पष्टीकरण महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी दिली.

गेल्या काही दिवसांपासून शहरातील लोकप्रतिनिधी पाणीपुरवठा विस्कळीत होत असल्याबद्दल महापालिका प्रशासनाला धारेवर धरत आहेत. त्यावर विचारले असता आयुक्त तेली-उगले म्हणाल्या की, सन २००० पासून सोलापूर शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. यामध्ये अधून मधून विस्कळीतपणा होत असल्याचे दिसून येते. त्याची विविध कारणे आहेत. शहराचे १७८ स्क्वेअर किलोमीटर क्षेत्रफळ असून सुमारे १२ लाख लोक राहतात. शहराची घनता कमी आहे. पाण्याची साठवण क्षमताही कमी आहे. टाक्या उंचावरील आहेत. जलवाहिनींच्या लांबी जास्त आहे. लोकसंख्या वाढली मात्र अद्यापही काही ठिकाणी जुन्या चार इंची पाईपलाईन आहेत. बोगस नळ कनेक्शन आढळून येतात. पाणी गळती आणि पाणी चोरीचेही प्रमाणही आहे. या सर्व अडचणी आहेत, या सोडवण्याचे आव्हान महापालिकेसमोर आहे. सध्या तरी रोज अथवा दोन दिवसाआड पाणीपुरवठा शक्य नाही. सध्या चार दिवसाआड पाणी पुरवठा करण्यासाठी नवीन आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यादृष्टीने नियोजन सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

### पाणीपुरवठयासंदर्भात सूचनांचे स्वागत करू

सोलापूर शहराला नियमित, सुरळीत पाणीपुरवठा व्हावा हा प्रमुख उद्देश आहे आणि त्यासाठी निवृत्त अधिकारी, अनुभवी लोकप्रतिनिधी, त्याचबरोबर ज्यांना या संदर्भात माहिती आहे अशा व्यक्तींनी अथवा संस्थांनी सूचना केल्यास त्यांचे स्वागत आहे. त्यांनी सूचना थेट आपल्याकडे कराव्यात, असे आवाहनही महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी केले आहे.

### तक्रार निवारण केंद्र...

सोलापूर शहरातील विविध भागात पाणीपुरवठा संदर्भात तक्रारी व अडचणी असल्यास त्याचे निराकरण करण्यासाठी तक्रार निवारण केंद्र महापालिकेत स्थापन करण्यात येत आहे. या ठिकाणी तीन कर्मचारी तैनात असतील. आलेल्या तक्रारीची नोंद करून त्या-त्या विभागाला कळविण्याची जबाबदारी या केंद्राकडे सोपवण्यात आल्याचे महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी सांगितले.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बुडत्याला काडीचा आधार, म्हंजे ?

| कल्याण |
| --- |
| 448-68-350 |

| मेन बाजार |
| --- |
| 490-30-460 |

# विश्वात कळीचा मुद्दा

साऱ्या विश्वात हवामानबदल हा संपूर्ण जगासाठी कळीचा मुद्दा ठरतोय. प्रदूषण आणि हवामानबदल रोखण्यासाठी जागतिक पातळीवर अनेक देश एकत्र येऊन काम करत आहेत. पण त्याला यश येत नाहीय, असे दिसते. हवामान बदलाचा परिणाम म्हणून जगाच्या पाठीवर कुठे दुष्काळ तर कुठे अतिवृष्टी दिसून येत आहे. महाराष्ट्रातीलच एक ताजे उदाहरण आपल्या डोळ्यापुढे आहे. मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात विदर्भ आणि मराठवाड्यात गारपीट झाली. सोलापूर जिल्ह्यालाही गारपिटीने झोडपून काढले. आता पुन्हा ऊन तीव्र होत चालले आहे. अधून मधून पुन्हा अतिवृष्टीचा इशारा हवामान खात्याकडून दिला जातोय. अमेरिका आणि युरोप खंडातील देश हवामान बदलाचे परिणाम भोगत आहेत. त्यामुळे तिथे आता सरकारविरुद्धच उठाव व्हायला लागलाय. स्विट्झर्लंड आणि फ्रान्समधील हवामानबदलामुळे आपापल्याच सरकारला कोर्टात खेचण्याची नामुष्की जनतेवर ओढवली आहे. हवामानबदलामुळे आमच्या जगण्याच्या अधिकारांवर गंडांतर येत असल्याचा दावा केला गेलाय तसेच सरकारच्या निष्क्रियतेमुळे हवामानबदलाला तोंड द्यावे लागत आहे, असा आरोपही करण्यात आला हवामानबदल हा संपूर्ण जगासाठी कळीचा मुद्दा ठरतोय. विशेष म्हणजे युरोपियन कोर्ट ऑफ ह्यूमन राईट्समध्ये (ईसीएचआर) याबाबत खटला सुरू आहे. स्विट्झर्लंड सरकारविरोधात येथील ज्येष्ठ नागरिकांच्या एका संघटनेने तर फ्रान्स सरकारविरोधात फ्रान्समधील माजी महापौराने तक्रार दाखल केली आहे. फ्रान्समधील ज्येष्ठ नागरिकांच्या या संघटनेचे नाव 'क्लब ऑफ क्लायमेट सीनियर्स' असे आहे. या संघटनेने 'हवामानबदलासाठी सरकार जबाबदार आहे. नागरिकांच्या घरांची जबाबदारी सरकारवर आहे. सरकार आपली जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरलेले आहे, असा आरोप केला आहे. स्विट्झर्लंडमध्ये



२०२२ साली उष्णतेची लाट आली होती. ही लाट एवढी भीषण होती की, येथील नागरिकांना साधारण ११ आठवड्यांसाठी घरातच राहावे लागले होते. संघटनेतील ८५ वर्षीय मेरी-ईव्ह वोल्कॉफ यांनी यावर आक्षेप घेतला होता. ही स्थिती कोरोना महासाथीच्या काळात लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनपेक्षा भीषण होती. हा 'क्लायमेट लॉकडाऊन' होता, अशा भावना वोल्कॉफ यांनी व्यक्त केलेल्या आहेत. अन्य एका महिलेने हवामानबदलाच्या मुद्द्यावर बोलताना उष्णतेमुळे मला श्वास घेण्यास अडथळा येत आहे. मळमळ होत आहे. माझी शुद्ध हरपते. हवामानबदलामुळे यामध्ये वाढ झाली आहे, असा दावा केला आहे. हाच मुद्दा घेऊन उत्तर फ्रान्समधील माजी महापौर डॅमियन केरेम यांनीदेखील ईसीएचआरमध्ये फ्रान्सविरोधात तक्रार दाखल केली आहे. सरकार त्यांची जबाबदारी पार पडण्यात अपयशी ठरले आहे. सरकारला हवामानबदलावर योग्य ती पावले उचलता आलेली नाहीत. परिणामी सरकार जनतेच्या जिवाचे रक्षण करण्यात अपयशी ठरले आहे, असा दावा डॅमियन केरेम यांनी केला आहे. दरम्यान, या खटल्याकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे. फ्रान्सच्या माजी पर्यावरणमंत्री कोरीन लेपेज यांनी या खटल्यावर प्रतिक्रिया दिली आहे. 'हवामानबदल रोखण्यात अपयश आल्यामुळे नागरिकांच्या जगण्याच्या अधिकारावर गंडांतर येत आहे असे युरोपीय कोर्टात सिद्ध झाल्यास, हा निकाल संपूर्ण जगासाठी एक उदाहरण ठरेल,' असे लेपेज म्हणाल्या आहेत. ईसीएचआर हे युरोपियन काऊन्सिलचे आंतरराष्ट्रीय कोर्ट आहे. युरोपियन काऊन्सिलचे ४६ देश सदस्य आहेत. भारतातही त्याचे परिणाम दिसत आहेत. केरळ आणि तमिळनाडू या सागरी किनारी असलेल्या राज्यांमध्ये सतत अतिवृष्टी होत आहे. चक्रीवादळाचा तडाखाही दरवर्षी बसू लागला आहे. महाराष्ट्रही ग्लोबल वॉर्मिंगच्या कचाट्यात सापडला आहे. गतवर्षी जूननंतर सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात राज्यात अतिवृष्टी झाली. बंगालच्या उपसागरात सतत कमी दाबाचा पट्टा निर्माण होतो. त्याचा परिणाम पावसात दिसतो. त्याचाही फटका राज्याला बसत आहे. त्यामुळे राज्यात कुठे अतिवृष्टी व कुठे दुष्काळ अशी स्थिती निर्माण होते आहे. प्रशांत महासागरातील अल- निनोचा हा परिणाम असल्याचे हवामान तज्ज्ञ सांगतात पण या स्थितीमुळे राज्यातील शेतीचे गणित बिघडले आहे. मदतीतून सरकारी तिजोरीवर मोठा भार पडत आहे. नैसर्गिक आपत्तीपुढे कुणाचे काहीच चालेना? आज हवा, नदी, सागर इथे प्रदूषण वाढत आहे. हे प्रदूषण मानव निर्मित आहे. आज प्रदूषण कमी करण्याचे आवाहन सरकारी पातळीवर केले जाते परंतु नागरिकांचीही तितकीच जबाबदारी आहे की, राष्ट्रीय संपत्तीचे रक्षण करण्याची. पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न स्वयंसेवी संघटनांकडून केले जातात पण जनतेचा त्याला फार प्रतिसाद मिळत नाही. हवेतील प्रदूषणाचा मानवी जीवनावर व निसर्गावरही परिणाम करत आहे. त्याला रोखायचे कसे हाच चिंतेचा विषय आहे.

अर्थकारण

# आर्थिक वर्षास निरोप

**सन २०२२-२०२३ संपण्यास आता काही तास शिल्लक राहिले आहेत. 'आयकर वाचवावा' म्हणून अगदी शेवटच्या क्षणापर्यंत गुंतवणूक केली जाते.**

**या गडबडीत काही चुका होऊ शकतात. अनेकदा विमा कंपन्यांच्या विविध योजना अगदी अखेरच्या क्षणी फारसा विचार न करता खरेदी केल्या जातात. आर्थिक बाबतीत होणारी कोणतीही चूक म्हणजे पर्यायाने आपले आर्थिक नुकसानच, तेव्हा विमा योजना खरेदी करताना होणाऱ्या संभाव्य चुका आणि त्यावरील उपाय याकडे लक्ष वेधण्याचा हा प्रयत्न.**

**टर्म इन्शुरन्स घेणे**

जर तुम्ही इन्शुरन्स योजना घेण्याचा प्रथमतः विचार करत असाल, तर आपल्या कार्यकालावधी एवढा टर्म इन्शुरन्स घ्या. अतिशय कमी प्रिमियममध्ये आपल्या कुटुंबाला सदस्यांना दुर्धर प्रसंगी आर्थिक आधार मिळतो. अन्य कोणत्याही प्रकारचा विमा यासाठी पुरेसा होऊ शकत नाही. योग्य आणि पुरेसा हे सापेक्ष शब्द आहेत. तरीही सर्वसाधारण संकेत असा की आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या २० पट, अधिक आपल्यावर असलेले कर्ज यांच्या बेरजेएवढ्या रकमेचे विमाछत्र हवे.

आता अनेक विमा कंपन्यांनी प्रीमियम परत देणाऱ्या, प्रीमियम अधिक काही विशिष्ट परतावा देणाऱ्या, विशिष्ट वर्ष सलग रक्कम भरल्यावर पुढील कालावधीत विमाछत्र देणाऱ्या अथवा एकदाच रक्कम भरून दीर्घकाळ विमा संरक्षण देणाऱ्या योजना बाजारात आणल्या आहेत. जेव्हा अधिक काहीतरी मिळणार तेव्हा त्यासाठी अधिक प्रीमियम द्यावा लागणार हे सूत्र लक्षात ठेवावे. विमा कंपन्या व्यवसाय करण्यासाठी स्थापन झाल्या आहेत, दानधर्म करण्यासाठी नाहीत. तेव्हा दरवर्षी विशिष्ट रक्कम भरून मिळणारे संरक्षण ज्याला इन्शुरन्सच्या भाषेत 'प्युअर टर्म इन्शुरन्स' म्हणतात, अशाच योजनांचा विचार करावा. अशा योजना लवकरात लवकर घेतल्याने प्रीमियम कमी पडतो. दरवर्षी तो न चुकता भरावा आणि निश्चिंत राहावे.




**विमायोजना आणि गुंतवणूक यांची सरमिसळ टाळा**

विमा संरक्षण आणि गुंतवणूक एकत्रितपणे देणाऱ्या योजना घेऊ नका. कारण, विमाछत्र मिळावे म्हणून तुम्ही त्या घेत असाल, तर त्याचा प्रीमियम खूप जास्त असल्याने वर उल्लेख केल्याएवढे पुरेसे संरक्षण तुम्ही कुटुंबास देऊ शकणार नाहीत. त्याचप्रमाणे तुम्ही योजना कालावधी पूर्ण केलात तरी मिळणारा परतावा हा बाजारदराहून कमी असेल तेव्हा अशा योजना टाळा. केवळ करसवलत आणि परतावा पाहिजे असेल म्युच्युअल फंडाच्या युनिट संलग्न गुंतवणूक योजना (इएलएसएस) योजना किंवा पीपीएफ यांचा स्वतंत्रपणे अथवा संयुक्त रीतीने विचार करता येईल.

**नाव आकर्षक वाटले म्हणून योजना खरेदी करू नका**

गुंतवणुकीच्या अनेक योजना आकर्षक नावाने बाजारात आणल्या जातात आणि त्यांचा आक्रमकपणे प्रचार/प्रसार केला जातो. खास मुलांसाठीच्या योजना, निवृत्ती नियोजन योजना, आत्मसन्मान/स्वावलंबन/आत्मनिर्भर/समृद्ध जीवन/गोल्डन इयर अशा काहीशा आकर्षक नाव असलेल्या विमा कंपन्यांच्या योजना आपले लक्ष वेधून घेतात; परंतु त्यातून मिळणारा परतावा हा बाजारात उपलब्ध असलेल्या परताव्याच्या तुलनेत कमी असतो.

इंडेक्स फंडात दीर्घकाळ केलेली गुंतवणूक तसेच वर उल्लेख केलेली इएलएसएसमधील गुंतवणूक यांनी दीर्घकाळात उत्तम परतावा दिला असल्याने आपण त्यांचा विचार करू शकतो आणि विमाछत्र हवं असल्यास टर्म इन्शुरन्सची जोड देऊ शकतो.

खात्रीपूर्वक परतावा याचाच अर्थ कमी परतावा

'खात्रीपूर्वक परतावा' हे दोन शब्द गुंतवणूकदारांच्या दृष्टीने परवलीचे शब्द आहेत. सहजता, रोकड सुलभता आणि आकर्षक परतावा याचे एकत्रीकरण असलेल्या एकमेव योजनेच्या शोधात सर्व गुंतवणूकदार आहेत; परंतु अनेक योजनांतून सर्व दृष्टीने समाधान करणारी एकही योजना बाजारात नाही. थोड्या लोभापायी अनेक गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये अडकून पडले आहेत. या पार्श्वभूमीवर निश्चित खात्रीपूर्वक परतावा देणाऱ्या कोणत्याही योजना या नेहमीच बाजारात उपलब्ध परताव्याहून कमी परतावा देत असतात. तेव्हा योजना निवडताना केवळ एवढाच निकष विचारात घेऊ नका.

**आरोग्यविमा घ्या**

आरोग्यावरील खर्चात सातत्याने होणाऱ्या वाढीकडे दुर्लक्ष करू नका. आपण आणि आपले कुटुंबातील सदस्य या सर्वांची गरज भागवणारा आरोग्य विमा आपल्याकडे असायलाच हवा. याची प्राथमिक पॉलिसी तरी असावी, तिला टॉप अप करून संरक्षण वाढवता येऊ शकते.

आपण कुठे राहतो? - गावात, शहरात की महानगरात, त्यानुसार आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या २ ते ५ पट आरोग्यविमा असणे गरजेचे आहे. आपल्या ऑफिसकडून अशी सुविधा मिळत असेल तरीही आपली स्वतः ची योजना असावी. आपण नोकरी सोडताच ऑफिसकडून मिळणारी सुविधा ताबडतोब बंद होते.

**विचलित होऊ नका**

हे सर्व तुम्ही आत्ताच वाचलं आणि आजच तुम्ही केलेली चूक तुमच्या लक्षात आली असेल. पण त्यामुळे विचलित न होता, योजना मंजुरी मिळाल्यावर आपणास हवी असलेली योजना कोणतेही कारण न देता पुढील १५ दिवसांत रद्द करू शकतो. असे केल्यास प्रशासकीय खर्च वगळून भरलेल्या प्रिमियममधील बरीचशी रक्कम आपल्याला परत मिळू शकते. या सुविधेचा लाभ घेऊन केलेली चूक दुरुस्त करा. त्याचप्रमाणे अशा चुका भविष्यात करू नका. गुंतवणूक ही आयत्या वेळी घाईघाईने करायची गोष्ट नसून विचार करून घेण्याचा निर्णय आहे. कोणत्याही विमा योजना हा त्यावरील हमखास उपाय नाही, हे लक्षात ठेवून येणाऱ्या नव्या आर्थिक वर्षाचे नियोजन करण्यास सुरुवात करा.


**- उदय पिंगळे.**

टुडेज् ब्लॉग

# बँकिंगची मुहूर्तमेढ

सिलीकॉन व्हॅली बँक बुडाल्यानंतर अमेरिकेतील बँक व्यवसायात चिंतेचे वातावरण पसरले. ह्या चिंतेचे प्रतिबिंब अमेरिकनवासी भारतीय आयटी व्यवसायातही पडले. कारण अनेक आयटी कंपन्यांचे उत्पन्न ह्या बँकांवर अवलंबून होते. अजून ह्या बँकबुडीचा भारतावर कितपत परिणाम होईल ह्याचा पध्दतशीर अभ्यास अर्थमंत्रालयाने केलेला नाही. एक समिती नेमण्यात आली असून त्या समितीचा नेमका अजेंडा काय हे अजूनही कोणालाही नीटसे उमगलेले नाही. अठराव्या शतकात हुंडी वटवण्याचा व्यवसाय करणाऱ्या मारवाडी-गुजराती पेढ्यांच्या मनमानी कारभाराच्या तक्रारी कंपनी सरकारने कशा हाताळल्या ह्याची माहिती गोविंद नारायण माडगावकर ह्यांच्या 'मुंबईचे वर्णन' पुस्तकात वाचायला मिळाली. अनबँकिंग रोखण्यासाठी काय उपाययोजना करता येईल हे ठरवण्यासाठी १७२० साली तत्कालीन कंपनी सरकारने मुंबईतील व्यापाऱ्यांची एक बैठक बोलावली.

ह्या बैठकीस हंडणावळीचा व्यवसाय करणारे सावकार, नाणावटी वगैरे मंडळी आवर्जून हजर होती. हुंडी वटवण्याचा व्यवसाय करणारे हुंडीवाल्यांकडून भरमसाठी कमिशन तर आकारायचेच, शिवाय हुंडी वटणाऱ्यांकडे रक्कम कमी पडल्यास त्यांना भरमसाठ व्याजाने पैसे द्यायचे. ह्या बेबंद व्यवसायाचे वर्चस्व मोडून काढण्यासाठी बँक काढण्याचा कल्पना कंपनींच्या अधिकाऱ्यांनी सुचवली. त्यानुसार सभा घेण्यासाठी दवंडी पिटवली. त्या सभेत कंपनीच्या अधिकाऱ्यांनी ह्या पहिल्या-वहिल्या बँकेसाठी १ लक्ष रुपयांचा निधीही जमा झाला. बँकेत बचत खाती सुरू करण्याची कल्पना राबवण्यात आली. दिवसास शेकडा एक दुगाणी (२ पया) व्याजही देण्याचे ठरले. हुंडी वटवण्याचा व्यवसाय ह्या बँकेकडे सोपवण्यात आला. परंतु सावकारी करणाऱ्यात निष्णात असलेल्या मारवाडी- गुजराती मंडळींनी ह्या बँकेचा पैसा वापरून आपला जुना धंदा चालू ठेवला. शेवटी बँकेचा पैसा त्यांच्याच हातात खेळत राहिला, ज्यांनी तो वापरला. वेळच्या वेळी परत करण्याचे नाव त्यांनी काढले नाही. परिणामी ही पहिलीवहिली बँक बंद पडली ! १८४० साली बँक स्थापन करण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न झाला. मागच्या चुका टाळल्यामुळे ह्या बँकेकडे ५२ लाख २५ हजार रुपयांचे भांडवल जमा झाले. त्या भांडवलामुळे बँकेकडे ३ कोटींचे खेळते भांडवल तयार झाले. सेव्हिंग बँकेची कल्पना जोरदार पध्दतीने राबवण्यात आली. बचतीवर सालिना ४ टक्के व्याज देण्याचा निर्णय झाला. ह्याच धर्तीवर अन्य ७ बँका निघाल्या.




त्या काळात बँकिंग व्यवसाय करणाऱ्या बँकांना 'बँक पेढी' असेच संबोधले जायचे. ह्या बँकांना रेल्वेचे, वाढत्या आयातनिर्यात व्यापाराचाही फायदा झाला. आर्थिक व्यवहारात प्रामाणिकपणाला अत्यंत महत्त्व असेत. ते ओळखून ह्या बँकांचा कारभार जास्तीत जास्त पारदर्शी करण्यात आला. त्या काळी स्थावरमालमत्ता गहाण ठेवणाऱ्यांना बँकिंग पेढ्यांकडून पध्दतशीर कर्ज मर्यादा मंजूर केल्या गेल्या. मुंबई शहरात झालेली व्यापारउद्योगांची भरभराट हे त्याचा दृश्य परिणाम आहे. जे कुठल्याही शहराला जमले नाही ते मुंबई शहराला जमले.

मुंबई शहराच्या व्यवसायाचा फायदा गुजरातला होत राहावा म्हणून फाजलअली कमिशनच्या शिफारशी डावलून महाराष्ट्राची गुजरातबरोबर सांगड बांधण्यात आली. आजही केंद्रातल्या गुजराती नेत्यांचा मुंबईवर डोळा आहेच !

**- रमेश झवर.**

जन्म हा अखेरचा

## कायानुग्रहस्थल - १



ही एकादशी वर्षातून एकदाच येते. वर्षभर काहीही करा आणि वर्षात एकाच आषाढी एकादशी करा, असे नाही. आषाढी-कार्तिकी एकादशी झाल्यावर आपल्या आयुष्यात रोज एकादशी घडली पाहिजे. याचा अर्थ रोज भोजन न करता फराळ करा, असा नाही. निव्वळ खाद्यपदार्थ बदलणे म्हणजे एकादशी करणे नव्हे. आपल्या एकादश इंद्रियांची प्रवृत्ती बदलणे, ही ईश्वराभिमुख करणे ही एकादशी होय.

ज्या इंद्रियांकडून आपण केवळ सांसारिक व्यवहारच केला ती इंद्रिये ईश्वरसन्मुख करणे हा एकादशीचा खरा अर्थ आहे. पायांनी मंदिराच्या दिशेने चालावे, वाणीने भगवंताचे गुण गावे, हातांनी टाळ्या वाजवाव्यात. डोळ्यांनी त्याचे रुप पाहावे, मनाने त्यांचे चिंतन करावे, अशी सर्वेंद्रिये जेव्हा भगवंताकडे एकवटतात तेव्हा आपल्याला एकादशी घडते. इंद्रियांना त्यांच्या विषयांपासून वळवून भगवंताकडे लावणे म्हणजे त्यांचा निरोध करणे होय. लोकांवर अनुग्रह करणारा शिवयोगी असाच सर्वेंद्रियांचा निरोध करीत असतो. म्हणून त्याला 'सकलेंद्रियाणि निरुद्ध्य' असे म्हटले आहे. त्याने सारी इंद्रिये भगवदर्पण केलेली असतात. ज्याची एकादश इंद्रिये भगवंताचे चिंतन करीत असतात, त्याला रोजच एकादशी घडत असते. रोज अशी एकादशी घडावी म्हणूनच संतांनी आपल्याला आषाढी-कार्तिकी एकादशी करायला सांगितले आहे. एकादशीच्या दिवशी कमीत कमी आहार घ्यावा, तो सात्त्विक असावा आणि दिवसभर भगवंताचे चिंतन करावे, असा एकादशीचा नियम आहे.


**(क्रमशः) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

## 'ओटीटी'वर अंकुश?

वास्तव दाखविण्याच्या प्रयत्नात अभद्र आणि अश्लीलतेकडे झुकणारी पटकथा, शिव्यांची लयलूट असलेली निरंकुश दृश्ये असे स्वरूप सध्या 'ओव्हर द टॉप'(ओटीटी) प्लॅटफॉर्मला लाभले आहे. एकीकडे अशा मुक्त अभिव्यक्तीचे स्वागत होत असले तरी भारतासारख्या पारंपरिक देशाची नवी पिढी त्यातून बिघडेल असा धोकाही व्यक्त होतो. अश्लील भाषेचा प्रयोग कदापि स्वीकारार्ह नसून अशा प्रवृत्तींना थोपविण्यासाठी कडक कारवाई करण्याचा विचार केंद्रसरकारकडून होत असल्याची तंबी केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अनुराग ठाकूर यांनी नुकतीच नागपुरात दिली. अनेक तक्रारी सरकारकडे आल्या असून त्यावर गंभीर विचार सुरू आहे, असे ते म्हणाले.

स्वातंत्र्याचा उपयोग सृजनासाठी व्हावा, शिव्या देण्यासाठी नाही अशी भूमिका त्यांनी मांडली. हे थोपविण्यासाठी नियमांमध्ये बदल करण्यासही सरकार संकोच करणार नाही, असा दावा त्यांनी केला. अभिव्यक्तीवर बंधने नसावीत असेच सर्वांना वाटते, मात्र किमान सभ्यतेचे निकष पाळले नाहीत तर फेरपडताळणी गरजेची असते. तुमच्या वेबमालिका युवकांची बुद्धी दूषित करीत असून असा चुकीचा पर्याय देणे थांबवा, या शब्दांत निर्मात्या एकताकपूर यांना मध्यंतरी न्यायालयाने फटकारले.



ओटीटी म्हणजे अनिर्बंध स्वातंत्र्य नव्हे, अशा आशयाचा ठाकूर यांचा इशारा त्याच अपेक्षेतून आला असावा. अर्थात यात सुवर्णमध्य हवा. परंपरांच्या नावाखाली सेन्सॉरचे जाचक निकष लादू नयेत, अशीच दर्शकांची अपेक्षा असेल. ओटीटी ही एक स्ट्रीमिंग मीडिया सर्व्हिस असून इंटरनेटमुळे मोबाइलमध्येही बघण्याची सोय त्यात आहे. टाळेबंदीत भारतात त्याचा झपाट्याने प्रसार झाला. भारतात आज चाळीसहून अधिक ओटीटी प्लॅटफार्म आहेत. सेन्सॉरमुक्त भवतालामुळे वेगही सुसाट आहे. या वर्षीपर्यंत ओटीटी बाजारपेठेत ४५ टक्के वाढीची शक्यता आहे.

सध्या ढोबळ बाजारपेठ २५० कोटींची आहे. त्यातील ग्राहकांची संख्या ५० कोटींच्या घरात जाण्याचा 'अर्नेस्ट अँन्ड यंग'चा अंदाज होता. प्रसारमाध्यमांवर कुणाचा अंकुश असावा, असा प्रश्न एकदा महात्मा गांधी यांना विचारण्यात आला. त्यावर बाहेरून नव्हे तर आतून हा अंकुश हवा, असे त्यांचे म्हणणे होते. ओटीटीच्या हातून आतील अंकुश निसटला आहे. बहुतांश प्रेक्षक याच मताचे असतील, यात शंका नाही.

# जागतिक 'बकरा' दिन

**१ एप्रिल हा दिवस मित्रांना मूर्ख बनविण्याचा, वेड्यात काढण्याचा, फसविण्याचा म्हणजेच 'एप्रिल फूल' करण्याचा दिवस समजला जातो. या दिवशी अनेक जण आपल्या मित्र-मैत्रिणींना काहीतरी खोटे सांगून फसविण्याचा प्रयत्न करीत असतात. याचे नियोजन खूप आधीपासून चाललेले असते. विशेष म्हणजे फसगत झालेला इतर दिवसांप्रमाणे या दिवशी न रागावता हसण्यावारी नेऊन त्यांच्या आनंदात तोही सहभागी होतो. एकंदर या दिवशी 'बुरा न मानो, होली है' असेच सगळीकडे वातावरण पहावयास मिळते. वेगवेगळ्या देशांमध्ये, वेगवेगळ्या कारणांसाठी हा दिवस साजरा केला जातो. न्यूझीलंड, ब्रिटन, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका या देशांमध्ये दुपारपर्यंतच एप्रिल फुल करण्याची पारंपरिक पद्धती आहे. दुपारनंतर असे करणाऱ्यास 'एप्रिल फुल' समजले जाते. ब्रिटनमधील वृत्तपत्रामध्ये एप्रिल फुलनिमित्त एक मुख्य पान काढले जाते. तथापि ते केवळ सकाळच्या आवृत्तीसाठीच असते. याशिवाय फ्रान्स, आयर्लंड, इटली, दक्षिण कोरिया, जपान, रशिया, नेदरलँड, जर्मनी, ब्राझील, कॅनडा आणि अमेरिकेमध्ये एप्रिल फूलचा माहौल पूर्ण दिवसभर असतो.**

**एप्रिल फूलची सुरुवात केव्हा व कशी झाली?**

एप्रिल फूल दिवसाची सुरुवात कशी झाली, याविषयी निश्चित अशी एक कथा किंवा आख्यायिका नसली तरी सर्वाधिक मान्यता ब्रिटिश लेखक चॉसर यांच्या 'द कैंटरबरी टेल्स' या पुस्तकातील 'नन्स प्रीस्टस टेल' या कथेवर आधारलेली आहे.

१३ व्या शतकामध्ये इंग्लंडचा राजा रिचर्ड द्वितीय आणि बोहेमियाची राणी एनी यांच्या लग्नाचा वाङ:निश्चयाची तारीख ३२ मार्च जाहीर केली जाते आणि कैंटरबरीतील लोक ती खरी मानतात. मात्र ३२ मार्च ही तारीख अस्तित्वात नसल्याने मूर्ख बनविले जातात. तेव्हापासून १ एप्रिल हा दिवस 'मूर्ख दिवस' समजला जातो. दुसऱ्या एका कथेनुसार प्राचीन युरोपमध्ये नवीन वर्ष १ एप्रिलला साजरे करण्याचा प्रघात होता. तथापि १५६४ मध्ये राजा चार्ल्स (नववा) ने नवीन कॅलेंडर अस्तित्वात आणले आणि नवीन वर्ष १ जानेवारीला साजरे करण्याचे निर्देश दिले. मात्र, बहुतांश लोकांनी १ एप्रिल लाच नवीन वर्ष मानले, तेव्हा अशा लोकांना मूर्ख समजून त्यांची मस्करी करण्यात आली. आणखी एका कथेनुसार १९१५ मध्ये जर्मनीच्या लिले विमानतळावर एका ब्रिटिश पायलटने खूप मोठा बॉम्ब फेकला. हे पाहून तेथे उपस्थित सर्व लोक इकडून-तिकडे पळू लागले आणि बराच वेळ लपून बसले. मात्र, बराच वेळ झाला तरी कोणताही धमाका न झाल्याने लोकांनी परत येऊन त्या जागी पाहिले तर तो बॉम्ब नसून एक मोठा फुटबॉल असल्याचे आणि ज्यावर 'एप्रिल फूल' लिहिल्याचे स्पष्ट झाले. 'एप्रिल फूल च्या संदर्भात १ एप्रिल १८६० हा दिवस तर इतिहासात विशेष प्रसिद्ध आहे. या दिवशी हजारो लोकांना टपालाद्वारे लंडन येथील 'टॉवर ऑफ लंडन' येथे सायंकाळी पांढऱ्या गाढवांच्या स्नानाचा कार्यक्रम होणार असून सर्वांनी त्यास उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले. विशेष म्हणजे त्याकाळी सामान्य जनतेला टॉवर ऑफ लंडनमध्ये प्रवेश वर्ज्य होता. संध्याकाळ होताच टॉवरजवळ हजारोंच्या संख्येने लोक जमू लागले आणि आत प्रवेश करण्यासाठी धक्का-बुक्की करू लागले. पण जेव्हा त्यांच्या लक्षात आले की आपल्याला मूर्ख बनविले गेले आहे, तेव्हा ते वैतागून घरी गेले.




**भारतीय कॅलेंडरची कथा**

पूर्वी संपूर्ण जगामध्ये भारतीय कॅलेंडर मानले जायचे, ज्यामध्ये नवीन वर्षाची सुरुवात चैत्र महिन्यापासून म्हणजेच एप्रिलपासून होते. तथापि १५८२ मध्ये पोप ग्रेगरींने नवीन कॅलेंडर लागू केले, ज्यानुसार नवीन वर्षाची सुरुवात एप्रिलऐवजी जानेवारीपासून होऊ लागली. बऱ्याचशा लोकांनी हे नवीन कॅलेंडर मान्य केले. तथापि काही लोकांनी नवीन कॅलेंडर मानले नाही आणि ते एप्रिलमध्येच नवीन वर्ष साजरे करू लागले.

या लोकांना मूर्ख समजले जाऊन येथूनच १ एप्रिल हा दिवस 'मुर्खांचा दिवस' म्हणून साजरा केला जाऊ लागला. तेव्हा, एप्रिल फूल ही पाश्चिमात्य देशांची संकल्पना असली तरी आज भारतासहित जगातील अनेक देशांमध्ये हा दिवस मोठ्या धडाक्यात साजरा केला जातो. यानिमित्ताने ही गंमत करताना अनेकांना मोठे नुकसानसुद्धा होऊ शकते, हे लक्षात घेऊन एप्रिल फुल साजरा करताना अशा काही गोष्टी कुणीही करू नयेत की ज्यामुळे समोरच्याचे नुकसान होईल किंवा त्या व्यक्तीला इजा होईल.

**- प्रा. विजय कोष्टी, जि. सांगली.**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी पाच विभागात पाण्याचे वेळापत्रक

## अंमलबजावणी करण्याचे अधिकाऱ्यांसमोर आव्हान

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर शहराला सुरळीत व नियमित पाणीपुरवठा करण्यासाठी शहराच्या पाणीपुरवठ्याची संपूर्ण माहिती घेत महापालिका आयुक्तांनी आराखडा तयार केला आहे. संबंधित अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेत शहराचे पाच विभागांतर्गत पाणीपुरवठ्याचे वेळापत्रकही तयार केले आहे. चार दिवसाआड नियमित आणि सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी अभ्यासांती हा आराखडा केला आहे. आता याच्या अंमलबजावणी करण्याचे आव्हान अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसमोर असणार आहे.



सोलापूर महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी शुक्रवारी विभाग प्रमुख व सर्व कनिष्ठ अभियंत्यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी शहराच्या पाणीपुरवठ्याचा गेल्या २० ते २५ वर्षापासूनचा इतिहास जाणून घेतला. पाणीपुरवठ्यातील अडचणी व आव्हाने काय आहेत ? याची मामहिती घेत आरखडा केला. सन २००० पासून सोलापूर शहराला साधारणतः चार दिवसाआड पाणीपुरवठा होत आहे. हा पाणीपुरवठा नियमित आणि सुरळीत कसा होईल ? याबाबत त्यांनी कर्मचारी - अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या. जे वेळापत्रक व नियोजन करण्यात आले आहे, त्यानुसार संबंधित कर्मचारी व अधिकाऱ्यांनी अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही आयुक्तांनी दिला आहे.



### असा आहे आराखडा

आयुक्तांच्या आराखड्यानुसार पाणीपुरवठ्यासाठी शहराचे ५ विभाग करण्यात आले आहेत. त्याचे वेळापत्रकही बनवण्यात आले आहे. कुठल्या टाकी वरून कोणत्या वारी, कोणत्या नगरांना पाणीपुरवठा केला जाणार आहे याचेही नियोजन केलं आहे. झोन अधिकारी, कनिष्ठ अभियंता, चावीवाला यांच्या कामाचा चार्ट तयार केला आहे.

### पाण्याचे वेळापत्रक झोननिहाय लावणार

सोलापूर शहराला चार दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केले आहे. शहरातील विविध विभागातील नगरांमध्ये कधी पाणीपुरवठा होणार? या संदर्भातले वेळापत्रक ही तयार करण्यात आले आहे. त्याचे चार्ट प्रत्येक झोन निहाय तसे त्या भागातील महत्वाच्या ठिकाणी लावण्यात येणार आहे.

### सोलापूर शहरात चालू स्थितीत ३०७६ हातपंप

सोलापूर शहरात एकूण ३ हजार ५८९ हातपंप, विंधन विहीर असून त्यापैकी ३०७६ चालू स्थितीत आहेत. ४०० हात पंपांची दुरुस्ती केली आहे तर १८७ हातपंप कायम बंद आहेत. त्याचे जल पुनर्भरण करण्याचे आदेशही दिले आहेत. इलेक्ट्रिक पंप बोरवेअरची संख्या एकूण ९७ असून त्यापैकी २५ हे बंद अवस्थेत आहेत तर ७२ चालू स्थितीत आहेत. बंद अवस्थेतील हे बोअरवेल दुरुस्त करण्याच्याही सूचना दिल्या आहेत, असे महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.



# श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे हवनकुंडीय महायज्ञ

✔ सुराज्य/सोलापूर

सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षीही श्रीराम जन्मोत्सव समिती व अखिल भारतीय तेलगू पुरोहित संघम यांच्या संयुक्त विद्यमाने दत्त नगर येथील हेडगेवार पटांगणात १५१ हवनकुंडीय महायज्ञ वेदमूर्ती वेणूगोपाल जिल्ला पंतलू यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. याप्रसंगी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती अक्कलकोट स्वामी समाधी मठाचे मुख्य पुजारी धनंजय महाराज यांची उपस्थिती होती.

महायज्ञ पार पडल्यानंतर पूर्व भागातून हजारो राम भक्तांच्या उपस्थितीत भव्य अशी रथ यात्रा पार पडली. याप्रसंगी जय श्रीराम चा जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून गेला.

महायज्ञ कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीराम जन्मोत्सव समितीचे संजय होमकर, संजय साळुंखे, अक्षय अंजिखाने, यतीराज होनमाने, सुधीर बहिरवाडे, अनिल वंगारी, ओंकार होमकर, गुरू कोळी, किरण वल्लाल, सतीश पारेली, रवी गायकवाड, आकाश शिरते, निखिल चाटला, महेश वाघमारे आदींनी परिश्रम घेतले.

# अपहरण केलेल्या मुलाला तेलंगणातून ताब्यात घेण्यात मोहोळ पोलिसांना यश

✔ सुराज्य/मोहोळ



चिंचोली काटी येथे राहणाऱ्या लहान मुलास किकराया तेलंगाना येथून सायबर सेलच्या सहकार्याने शोधून काढण्यास मोहोळ पोलिसांना यश मिळाले. शुक्रवारी दुपारी त्यास मोहोळ पोलिस ठाण्यात त्याच्या नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आले.

हा मुलगा ११ एप्रील रोजी एमआयडीसी चिंचोली काटी येथून हरवला होता त्याचे आजोबा प्रकाश कुंची कोर यांनी याबाबत मोहोळ पोलीस ठाण्यात ११ जानेवारी रोजी पर्यंत दाखल केली होती. त्याबाबत मोहोळ पोलीस त्याचा सर्वत्र असून तपास करत होते परंतु त्याचे धागेदोरे लागत नव्हते. सपोनि खारगे व शरद ढावरे यांच्याकडे तपास आल्यानंतर त्यांनी चिंचोली काटी, विडी घरकुल, सोलापूर, लातूर, पंढरपूर, तुळजापूर, तसेच बुधडा जिल्हा उस्मानाबाद या ठिकाणी जाऊन संशयित लोकांकडे विचारपूस करून आरोपी व मुलाचा कसून शोध घेतला. तसेच संशयित लोकांचे मोबाईल कॉल डिटेल ही तपासले तरीही याचा तपास लागेना. त्यांनी या केसचा सखोल अभ्यास करून त्यातील संशयित नंबरची सायबर सेल कडून सम्पूर्ण माहिती करून घेतली. त्याचा अभ्यास केला असता त्याचे लोकेशन हे तेलंगणा राज्यातील विकिराबाद या ठिकाणी असल्याचे दिसून आले .

पोलिस निरिक्षक विनोद घुगे यांच्या मार्गदर्शनानुसार पोसई खारगे व शरद ढावरे यांनी जिल्हा विकिराबाद (तेलंगणा) या ठिकाणी जाऊन संशयित मोबाईल क्रमांकाच्या संपर्कात असणाऱ्या लोकांची माहिती घेतल . मोबाईल क्रमांकाच्या संपर्कात असऱ्या व्यक्तींना ताब्यात घेऊन सदर मुलगा व आरोपी बाबत चौकशी केली. मुलगा व आरोपी हे रंगारेड्डी येथील एका हॉटेलात व स्क्रॅप दुकानात काम करत असल्याची माहिती त्यांच्या कडून मिळाली.

मुलगा हा एमआयडीसी चिंचोली या ठिकाणचा राहणारा असून आरोपी हा त्याच्या घराशेजारी राहण्यास होता व तो एमआयडीसी मिळेल ती मजुरी करीत होता त्याने त्या लहान मुलास मोबाईल घेऊन देतो असे सांगून अडीच महिन्यापूर्वी पळवून नेले होते. मुलास पळवून नेणारा किसन दुबया सामलेटी यास पकडण्यास पोलिसांना यश मिळाले .



# कोठे यांच्या वाढदिनी ९१ जणांचे रक्तदान

✔ सुराज्य/सोलापूर

विडी घरकुलचे भाग्यविधाते महेश अण्णा कोठे यांच्या वाढदिवसानिमित्त गेल्या चार वर्षांपासून नरेश कोलप्याक विश्वस्त श्री शंभोमारुती चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येते. यंदाचा रक्तदान शिबिरात ९१ रक्तदात्यांचा सहभाग नोंदविला.

आमच्या या कार्यास उत्तम प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी प्रमुख उपस्थिती पोलीस निरीक्षक राजेंद्र माने, विनायक कोंड्याल, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, विठ्ठल कोटा, अजय पोन्नम यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे संयोजन नरेश कोलप्याक, गोविंद संकाराम, गिरीश कोटा, वासुदेव इप्पलपल्ली, रवी बुगडे, सागर गंजी, शुभम वईटला, मधुकर बुगडे, अमर संगा, राजेश कोलप्याक यांनी केले. सिद्धेश्वर ब्लड बँक यांचे विशेष सहकार्य लाभले.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**'ई निविदा सुचना'**

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून ई-निविदा सुचना प्रक्रिया मार्फत गाळणी संच पंढरपूर विभागांतर्गत लोखंडी व सिमेंट पोल, वितरण रोहित्र, मिटर्स, ऑईल बॅरेल चढ/उतार इ. कामासाठी निवीदा मागविण्यात येत आहे. निविदा क्रमांक काअ./पंढरपूर/तां/टी-१६/२०२२-२३ निविदा जमा करण्याची शेवटची तारीख ०७/०४/२०२३ रोजी सायंकाळी २३.५९ पर्यंत इतर सर्व माहिती निविदा वेबसाईटवर उपलब्ध आहे. https:/e-tender.mahadiscom.in/eatApp/. निम्नस्वाक्षरी धारकांकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखुन ठेवले आहेत.

**ऑफीसचा पत्ता :-** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर

**पीआरओ.२२३/२०२२-२३** **कार्यकारी अभियंता (संवसु) पंढरपूर**

# घोटाळा बाहेर येईल म्हणूनच भाजपकडून राहुल गांधी यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई

## माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांचा आरोप

✔ सुराज्य/सोलापूर



राहुल गांधी यांनी संसदेत आदानी घोटाळ्यासंदर्भात प्रश्न विचारल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे घाबरले आहेत. त्यामुळेच केंद्र सरकारकडून राहुल गांधी यांच्या विरोधातील मानहानीचे प्रकरण बाहेर काढून त्यांना दोन वर्षाची शिक्षा सुनावली. भाजपमुळे देशाचे संविधान धोक्यात आले आह. याचा तीव्र शब्दात काँग्रेस निषेध करत आहे. संपूर्ण काँग्रेस राहुल गांधी यांच्या पाठीमागे उभी असल्याचे प्रतिपादन माजी गृहराज्यमंत्री रमेश बागवे यांनी पत्रकार परिषदेत केले.

काँग्रेसच्या वतीने संपूर्ण देशभरात राहुल गांधी यांच्या समर्थनात मोहीम सुरू केली आह. त्याचाच एक भाग म्हणून रमेश बागवे यांनी सोलापुरातील काँग्रेस भवन येथे पत्रकार परिषद घेऊन राहुल गांधी यांचे समर्थन केले. बागवे म्हणाले की, राहुल गांधी यांनी संसदेत आदानी घोटाळ्याचा मुद्दा उपस्थित केला. मात्र त्यांच्या भाषणाचा भागच संसदेच्या कामकाजातून वगळण्यात आला.

सत्ताधारी पक्षाचे कामकाज चालू न देण्याचा प्रकार त्यांच्याकडून होत आहे. आदानी यांना वाचवण्यासाठी मोदी सरकार सर्व शक्ती पणाला लावा लावत आहे. हाच घोटाळा राहुल गांधी बाहेर काढत आहेत म्हणून त्यांच्यावर जाणीवपूर्वक सूडबुद्धीने कारवाई करण्यात आली आहे. त्यांची २४ तासाच्या खासदारकी रद्द केली तसेच त्यांचा बंगला खाली करण्यासाठी नोटीसही पाठवली आहे. त्यामुळे मोदी सरकार राहुल गांधी यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई करत आहे हे स्पष्ट होते. या संपूर्ण प्रकरणाकडे लक्ष विचलित करण्यासाठी भाजपने ओबीसी समाजाचा मुद्दा उचलून धरला आहे.

वास्तविक काँग्रेसने कधीही ओबीसी समाजाचा अपमान केला नाही. सध्या ओबीसी समाजाचे दोन मुख्यमंत्री काँग्रेसमध्ये आहेत. मोदी सरकारचे घोटाळे राहुल गांधी बाहेर काढत आहेत त्यामुळे त्यांच्यावर सूडबुद्धीने कारवाई करण्यात येत असल्याचा आरोपही बागवे यांनी केला. या पत्रकार परिषदेला शहराध्यक्ष चेतन नरोटे, जिल्हाध्यक्ष डॉक्टर धवलसिंह मोहिते पाटील, माजी आमदार रामहरी रुपनवर, धनाजी साठे बाळासाहेब शेळके आदी उपस्थित होते.

**कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना लि., श्रीपूर.**
**ता.माळशिरस, जि.सोलापूर**

फोन नं.०२१८५/२५५२३३, ३४४ फॅक्स नं.०२१८५-२५५४३५
Email-spssk_sugar@yahoo.com spssk_sale@yahoo.com

**खुली साखर विक्री टेंडर**

आमचे कारखान्याकडे हंगाम २०२२-२३ मध्ये उत्पादीत झालेल्या साखर पोत्यापैकी, माहे एप्रिल २०२३ ते सप्टेंबर २०२३ या कालावधीत खुल्या बाजारात साखर विक्रीसाठी ५० किलो एम-३०, एस १-३० व एस २-३० या ग्रेडची सिलबंद टेंडर्स प्रत्येक आठवड्यातील सोमवार व गुरुवार या दिवशी स्वतंत्ररित्या मागविणेत येत आहेत. सदरच्या दिवशी सुट्टी असल्यास त्याचे दुसऱ्या दिवशी टेंडर मागविण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक टेंडरमध्ये विक्री करावयाची साखर पोती डिलीव्हरीची मुदत टेंडरची वेळ त्या त्या टेंडरचे दिवशी कळविली जाईल. सदर दिवशी कारखाना साईटवर ई मेल व फॅक्सद्वारे टेंडर स्विकारली जातील. टेंडर मंजूर झालेनंतर ज्या त्या टेंडरमध्ये खरेदी केलेल्या साखरेची संपूर्ण किंमत ४८ तासाचे आत आर.टी.जी.एस. ने किंवा डी.डी./चेक ट्रान्सफरद्वारे कारखान्याच्या बँक खातेत जमा करावयाची आहे. दिलेल्या मुदतीत साखर उचलणे बंधनकारक राहील.

टेंडरबाबतचे सर्व अधिकार व्यवस्थापनाने राखून ठेवले आहेत. तरी टेंडरधारकांनी आपली टेंडर्स वेळेत पाठवावीत.

**डॉ.यशवंत कुलकर्णी** कार्यकारी संचालक — **श्री.कैलास खुळे** व्हा.चेअरमन — **मा.आ.श्री.प्रशांतराव परिचारक** चेअरमन

**जाहीर समन्स**
**मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)**
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**दि.पंढरपूर अर्बन को-ऑप, बँक लि.,पंढरपूर ... अर्जदार**
**४१६३ ब, प्रशासकीय भवन, नवी पेठ, पंढरपूर**
**विरुद्ध**
(खालील तपशिलामध्ये नमुद केलेले थकबाकीदार/कर्जदार) ... **जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार | जाब देणार यांचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १८४०/२०२२-२३ | ३०४९९९/- | ४ | विजय दत्तात्रय गायकवाड रा.४०८३, भोसले चौक, पंढरपूर |
| २ | १८४१/२०२२-२३ | २९३६९२/- | १ | शिवप्रसाद काशिनाथ वठारे रा.वांगीकर नगर,लिंक रोड, पंढरपूर |
| ३ | १८४२/२०२२-२३ | २९४७८६/- | १ | ज्ञानेश्वर नंदकुमार कुलकर्णी रा.३४१०, चांभार गल्ली, कालिकादेवी चौक, पंढरपूर |
| ४ | १८४३/२०२२-२३ | २१५९३४/- | ३ | श्रीपाद भालचंद्र दाते रा.प्लॉट नं.२१, रेल्वे स्टेशन जवळ, पुंडलिक नगर, पंढरपूर |
| ५ | १८४४/२०२२-२३ | २०७६७१/- | ३ | कल्पना शामलिंग जव्हेरी रा.८५, उमेद गल्ली, पंढरपूर |
| ६ | १८४५/२०२२-२३ | ८२२५०/- | १<br>२ | इम्रान सत्तार पटवेकरी रा.३२२४, मोमीनवाडा, विजापूर गल्ली, पंढरपूर<br>सत्तार महंमद पटवेकरी रा.जुना कासेगांव रोड, पंढरपूर |
| ७ | १८४६/२०२२-२३ | ९८५३०/- | २ | धर्मराज तुकाराम भिसे रा.४२८७, कडबे गल्ली, पंढरपूर |
| ८ | १८५७/२०२२-२३ | ९११७३/- | ३ | निलीमा नितीन व्होरा रा.१६७४, मेंढे गल्ली, पंढरपूर |
| ९ | १८५८/२०२२-२३ | १२६०९२/- | १ | नारायण पांडुरंग हुच्चे रा.२२६८, मुक्ताबाई मठामागे, पंढरपूर |
| १० | १८६१/२०२२-२३ | १६४३७१/- | ३ | बालाजी चंद्रकांत ठेंगील रा.पुळुज, ता.पंढरपूर |
| ११ | १८६०/२०२२-२३ | ५११९९/- | १<br>२<br>३<br>४ | मनोज कैलास शिंदे रा.७३४ ब, गोविंदपूरा, पंढरपूर<br>लक्ष्मी कैलास शिंदे रा.७३४ ब, गोविंदपूरा, पंढरपूर<br>वर्धमान धर्मराज मोहिकर रा.२१८३, कवठेकर गल्ली, पंढरपूर<br>प्रियांका वर्धमान मोहिकर रा.कवठेकर गल्ली, पंढरपूर |
| १२ | १८६५/२०२२-२३ | १२३०३२/- | २<br>३ | लता रघुनाथ ढेरे रा.१११ अ, कडबे गल्ली, पंढरपूर<br>मयुर रघुनाथ भोसले रा.कडबे गल्ली, पंढरपूर |
| १३ | १८६७/२०२२-२३ | ५७००५/- | २ | गणेश शामराव शिंदे रा.हरिदास वेस, पंढरपूर |
| १४ | १८६८/२०२२-२३ | १२५७०६/- | १<br>२ | विशाल रघुनाथ भोसले रा.हरिदास वेस, पंढरपूर<br>लता रघुनाथ ढेरे रा.१११ अ, कडबे गल्ली, पंढरपूर |
| १५ | १८७२/२०२२-२३ | १०१३१७/- | २<br>४ | छगन शेषप्पा मंजुळे रा.पोलीस लाईन, पंढरपूर<br>रेखा छगन मंजुळे रा.पोलीस लाईन, पंढरपूर |
| १६ | १८७४/२०२२-२३ | ५८२४९/- | २ | नारायण नामदेव परचंडे रा.हनुमान मैदान, पंढरपूर |
| १७ | १८७६/२०२२-२३ | १३९८३३/- | ४ | कल्पना विलास माने रा.गोविंदपूरा, जुनी पेठ, पंढरपूर |
| १८ | १८७५/२०२२-२३ | ४९३३५/- | १<br>२<br>३<br>४ | पुनम मनोज शिंदे रा.घर नं.७३४, गोविंदपूरा, पंढरपूर<br>मनोज कैलास शिंदे रा.७३४ ब, गोविंदपूरा, पंढरपूर<br>लक्ष्मी कैलास शिंदे रा.७३४ ब, गोविंदपूरा, पंढरपूर<br>प्रियांका वर्धमान मोहिकर रा.कवठेकर गल्ली, पंढरपूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत. उपनिर्दीष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वार **सोमवार, दि.१७/०४/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.३१/३/२०२३ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी
बँक्स् असोसिएशन लि., सोलापूर

**विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना लि., गंगामाईनगर**
पो.पिंपळनेर, ता.माढा, जि.सोलापूर ई-मेल आयडी - vs.sugar@gmail.com

**फ्रिसेल साखर विक्री टेंडर नोटीस**

आमच्या साखर कारखान्याचे युनिट नं.१ पिंपळनेर व युनिट नं.२ करकंब येथे सन २०२२-२३ गळीत हंगामामध्ये उत्पादित झालेल्या साखरे पैकी माहे एप्रिल २०२३ मध्ये खुली साखर खालील तारखांना खुल्या बाजारात टेंडर पद्धतीने विक्री करावयाचे आहेत.

| अ. नं. | टेंडर दिनांक | वार | अ.नं. | टेंडर दिनांक | वार |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०३/०४/२०२३ | सोमवार | २ | ०६/०४/२०२३ | गुरुवार |
| ३ | १०/०४/२०२३ | सोमवार | ४ | १३/०४/२०२३ | गुरुवार |
| ५ | १७/०४/२०२३ | सोमवार | ६ | २०/०४/२०२३ | गुरुवार |
| ७ | २४/०४/२०२३ | सोमवार | ८ | २७/०४/२०२३ | गुरुवार |

तरी इच्छुक व्यापाऱ्यांनी आपले टेंडर सिलबंद/ ई-मेलद्वारे वरील तारखांना सायं.५.०० वाजेपर्यंत कारखाना ऑफिसमध्ये द्यावीत. कार्यालयात टेंडर मंजूर झाल्यास प्रती पोत्यास रू.५०/- प्रमाणे डिपॉझीट ताबडतोब भरणेचे आहे. करारपत्र करून दिलेनंतर त्याचे पालन करणे खरेदीदारास बंधनकारक राहील. विक्री करावयाचे परिमाण व उचलणेची शेवटची तारीख त्या त्या दिवशी कळविणेत येईल. टेंडर मंजूर अथवा नामंजूर करणेचा अधिकार कारखान्याकडे राहील. यासंबंधी काही माहिती हवी असल्यास कारखाना कार्यालयात ऑफिस वेळेत संपर्क साधावा.

**एस.आर.यादव** जनरल मॅनेजर (युनिट नं.२) — **एस.एन.डिग्रजे** कार्यकारी संचालक — **वामनराव प्रल्हाद उबाळे** व्हाईस चेअरमन — **आ.बबनराव विठ्ठलराव शिंदे** संस्थापक चेअरमन

**अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट**

जा.क्र. २०२३/न.प.अ.कोट/बांधकाम ११/संकलन-४ कावि १८९ आरआर दि.३१/०३/२०२३

**जाहीर फेर ई-निविदा क्र.** **वार्षिक निविदा प्रसिध्दीकरण**

मुख्याधिकारी नगरपरिषद अक्कलकोट हे शासनाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून ई-निविदेच्या प्रणालीव्दारे निविदा मागविणेत येत आहेत. कोऱ्या ई-निविदेचा नमुना https://mahatenders gov.in या संकेतस्थळावर दि.०३/०४/२०२३ ते दि.१७/०४/२०२३ या कालावधीमध्ये उपलब्ध राहील सदर कामाची ई-निविदा कंत्राटदाराने https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.१७/०४/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत सादर करावेत, याकामाची निविदा पूर्व बैठक दि. १३/०४/२०२३ रोजी ठिक ०३.०० वाजता नगरपरिषद कार्यालय अक्कलकोट येथे घेण्यात येईल, निविदा शक्य झाल्यास दि. १९/०४/२०२३ रोजी दु.४.०० वाजता उपस्थित मक्तेदार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत रूपये | बयाणा रक्कम रूपये | कामपूर्ण करण्याची काल मर्यादा | निविदेचा प्रकार व किंमत | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बांधकाम विभागाकडे लागणारे साहित्य पुरवठा करणे तसेच रस्ते, गटार व इतर बांधकाम विषयी दुरुस्ती करणे काम | २५,००,०००/- | २५,०००/- | एक वर्ष | १,५००/- | शासन निर्णय प्रमाणे |

टिप- १. सर्व पात्र व इच्छुक कंत्राटदारांनी निविदा डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेण्यासाठी ई- निविदा प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करणे आवश्यक आहे.
२. निविदा काराने वर नमुद केलेल्या संकेत स्थळावर निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करणे संदर्भात काही/अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. **टोल फ्री नंबर-१८००२३३२२३०**
३. आजमितीस शासनाच्या वेबसाईटवर ऑनलाईन पध्दतीने पेमेंट भरणेचे असल्याने सदर कामाकरिता मक्तेदारांनी खालील नमुद अकाऊंट नंबर ऑनलाईन पेमेंट भरणेचे आहे.
४. शासन निर्णयान्वये आवश्यकतेनुसार परफॉमर्स सिक्युरिटी डिपॉझिट भरणे आवश्यक राहील.

**युनिय बँक ऑफ इंडिया, अक्कलकोट शाखा, खाते क्र.६७८१०२०१००० ३३९१.**
union Bank Five Digit Code No.67810, IFSC Code-UBIN0567817

कोणतेही कारण न देता कोणतीही बाब अगर सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. याकामी शासनाकडून व नगरपरिषदकडे निधी उपलब्धतेनुसार बिल अदा करणेत येईल.

**सही/-**
**(सचिन पाटील)**
**मुख्याधिकारी तथा प्रशासक**
**नगरपरिषद अक्कलकोट**



## सोलापूर महामार्गावरील सांगोला वळण रस्त्यासाठी अधिकाऱ्यांकडून पहाणी

**सांगोला** : राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी यांनी आज सांगोल्यात अशोक कामटे संघटनेच्या समवेत महामार्गाच्या समस्या संदर्भात भेट देऊन तात्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासित केले. मिरज दिशेने सांगोलाकडे येणाऱ्या राज्य महामार्गाकडून नागरिकांना, वाहनांना सांगोला वळण दिलेले नाही .त्यामुळे सर्वच वाहनांची दैनंदिन मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. याबाबतचे निवेदन शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटनेच्यावतीने सोलापूर दिल्ली येथील प्रकल्प संचालक अधिकारी राष्ट्रीय महामार्ग, जिल्हाधिकारी, सोलापूर यांना देण्यात आले होते. या सर्व परिस्थितीचि पाहणी व अहवाल सादर करण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता पी जी नाईकवाडे यांनी सांगोल्यात प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. सांगली, मिरज कडून सोलापूर दिशेने या मार्गावरून सांगोला शहरात प्रवेश करू इच्छिणारी वाहने अधिकृत वळण व फलक नसल्याने थेट मार्गावरून दिशेने वाहने सुसाट शहर सोडून बाहेर ७ ते १० किलोमीटर गेल्यावर पूर्णपणे लक्षात येत आहे .शहरात येणाऱ्या वाहनांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे राष्ट्रीय महामार्ग विभागा या समस्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे संबंधित विभागास निदर्शनास आणून दिले, दैनिक सुराज्य व विविध वृत्तपत्राच्या माध्यमाने याबाबत आवाज उठवल्याने प्रशासन खडबडून जागे झाले आहे. त्याकरिता सूतगिरणीच्या पुढे डाव्या बाजूला माऊली पेट्रोल पंपा जवळ किंवा शेतकरी सूतगिरणीच्या वजन काट्या नजदीक अधिकृत वळण व दिशादर्शकाची सोय तात्काळ करावी अशी शहर व परिसरातील नागरिकांची मागणी यापूर्वी केली होती. याकरिता शहीद अशोक कामटे बहुउद्देशीय सामाजिक संघटना प्रयत्नशील आहे. तरी संबंधित विभाग या संपूर्ण परिसराचा अहवाल वरिष्ठ कार्यालयास पाठवणार असल्याचे कळविले आहे, तरी तात्काळ वळण व्यवस्था करावी अशी मागणी अशोक कामटे संघटनेने एन एच आय सोलापूर विभागीय कार्यालय यांच्याकडे लेखी पत्राद्वारे केली आहे. तरी या कार्यालयाने लवकरात लवकर या मार्गावर तोडगा काढणार असल्याचे शहीद अशोक कामटे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले.

## सांगोला नगरपालिकेच्या कर्मचारी महिलांनी स्वच्छतेची घेतली शपथ

**सांगोला** : सांगोला नगरपरिषदेचे महिला व पुरुष कर्मचारी वृंद यांनी परिसर स्वच्छतेबाबत तसेच कचरा घंटागाडीच टाकावा, ओला सुका कचरा वर्गीकरणाचे महत्व, शून्य कचरा प्रणाली अंतर्गत ओला कचरा घरच्या घरी जिरवण्यासाठी होम कंपोस्टिंग, सुका कचऱ्याचे पुनर्वापर करण्यासाठी जनजागृती, प्लास्टिकचे वापर टाळून कापडी पिशवीचा वापर करणे बाबत, आदि संदर्भात या वेळी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर मुख्याधिकारी डॉ सुधीर गवळी व नगर परिषद अधिकारी यांच्या समवेत उपस्थित सर्व महिलांनी स्वच्छते संदर्भातील स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. त्यानंतर रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये सर्व महिलांनी स्वच्छतेबाबत च्या स्वच्छ सांगोला सुंदर सांगोला या घोषणा दिल्या. यावेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे सर्व स्वच्छता निरीक्षक, स्वछता दूत, बचतगट सदस्य तसेच इतर संबंधित महिला व सफाई कर्मचारी इ उपस्थित होते. सदर मशाल मार्च रॅली यशस्वी पार पाडण्यासाठी सांगोला नगरपरिषदेच्या शहर समन्वयक तेजश्री निशांत बगाडे व कार्यालयीन अधिक्षक विजयकुमार कन्हेरे व सहा प्रकल्प अधिकारी योगेश गंगाधरे व इतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सदर रॅलीची सांगता स्वच्छतेची शपथ घेवून झाली.

## सोलापुरात शासकीय मैदानावर घेता येणार स्टेडियमचा अनुभव

**सोलापूर** : टाटा आयपीएलचे सोलापुरात शासकीय मैदानावर फॅन्न पार्कमध्ये भव्य स्क्रीनवर थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. याठिकाणी स्टेडियमचा अनुभव घेता येईल, अशी माहिती सोलापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे चंद्रकांत रेम्बोर्स यांनी पत्रकार परिषदेत दिली. विजापूर रोडवरील शासकीय मैदानावर दि. १ व २ एप्रिल २०२३ रोजी दुपारी १.३० वाजता या फॅन पार्कमध्ये चाहत्यांना आनंद लुटता येईल. टाटा आयपीएल आता पूर्वीपेक्षा मोठे, भन्नाट आणि आकर्षक होत आहे. यावेळी सर्व चाहत्यांसाठी शिट्ट्या, जल्लोष, चेहरे रंगविणे, आरडाओरड, जबरदस्त स्टेटस, वगैरे करण्याची संधी आहे. क्रिकेट खेळाडू आवडते संघ आणि इतर अनेक गोष्टींबद्दल अफाट प्रेम दाखविणाच्या चाहत्यांसोबत आयपीएल २०२३ ॅन पार्कच्या चाहत्यांना सोबत घेऊन येत आहे. ४५ शहरांतील चाहत्यांना सोबत घेऊन, फॅन पार्क्स संपूर्ण देशभरात आयपीएलचे वादळ घेऊन जाण्यास आता सज्ज आहे. अनेक धमाल उपक्रमांमुळे चाहत्यांना आपण स्टेडियममध्येच आहोत असे वाटेल. जेथे ते त्यांच्या आवडत्या संघाचा जयजयकार करू शकतील. रोमांच आणि उत्साह अधिक वाढवण्यासाठी, फॅन पार्कला भेट देणाऱ्या चाहत्यांना त्यांचा आवडता संघ, खेळाडू किंवा क्रिकेटबद्दल त्यांचे प्रेम व्यक्त करून त्यांचे चाहते असल्याचा पुरेपूर आनंद घेता येईल. जो आपण सर्वाधिक वेडा चाहता असल्याचे सिद्ध करू शकेल. त्याला फायनलचे तिकिट जिंकता येईल. यावेळी फॅन्न पार्कमध्ये पाच ते दहा हजार क्रिकेटप्रेमी कमाल आनंदाचा अनुभव घेतील. हिट्स आणि बाऊंडरीज, हॅट्रिक्स आणि स्पिनचे प्रत्यक्षदर्शी साक्षिदार होण्यासाठी तुमच्या शहरातील फॅन्न पार्कमध्ये तुमच्या चैतन्याला उधाण येऊ द्या, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस राजन कामत, अनंत दातार, प्रकाश भुतडा, राजेंद्र गोटे आदी उपस्थित होते.

## नंदकिशोर येमूल यांचे निधन



**सोलापूर** : येथील सिव्हिल लाईन्समधील रहिवासी व फेडरल बँकेचे वरिष्ठ अधिकारी नंदकिशोर रमाकांत येमूल (वय ४८) यांचे शुक्रवार, दि. ३१ मार्च रोजी सकाळी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, वडील, एक भाऊ, बहीण, पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दुपारी पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. स्टेट बँकेचे निवृत्त अधिकारी रमाकांत येमूल यांचे ते पुत्र तर अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. श्रीनिवास येमूल यांचे बंधू होत.

# सुधाकरपंतांकडून सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी पांडुरंग कारखान्याची उभारणी : परिचारक

## २०२३ लाही महाराष्ट्रभर चांगला पाऊस पडणार : पंजाबराव डक

**सुराज्य/श्रीपूर**

महाराष्ट्र राज्यासह देशातील सहकारी साखर कारखानदारीत आदर्श ठरलेल्या, पांडुरंग सह. सहकारी साखर कारखान्याला, कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांचे नाव देऊन त्यांच्या कार्याचा यथोचित गौरव करण्यात आला. हा नामविस्तार सोहळा शुक्रवारी (दि.३१) रोजी पार पडला. यावेळी चेअरमन प्रशांत परिचारक यांनी शेतकरी सभासदांच्या सर्वांगीण हितासाठी पांडूरंग परीवार सदैव प्रयत्नशील राहील याची ग्वाही दिली.

पांडुरंग सह. साखर कारखान्याला आता 'कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडूरंग सह. साखर कारखाना' असे नाव देण्यात आले, पांडूरंग परिवारातील सभासद शेतकरी बांधवांच्या साक्षीने पार पडलेल्या या नामविस्तार सोहळ्याला कारखान्याचे चेअरमन प्रशांत परिचारक, हवामान विश्लेषक पंजाब डख, युटोपीयन कारखान्याचे अध्यक्ष उमेश परिचारक, व्हा. चेअरमन कैलास खुळे, कार्यकारी संचालक डॉ. यशवंत कुलकर्णी दिनकर भाऊ मोरे , यांच्या सह सर्व नवे, जुने संचालक मंडळ, कै. सुधाकरपंत परिचारक यांचे बरोबरचे कार्यकर्ते, कारखान्याचे अधिकारी वर्ग आणि श्रीपूर महाळूंग मधील विविध राजकिय व सामाजिक पदाधिकारी उपस्थित होते.

या सोहळ्या प्रसंगी बोलताना प्रशांत परिचारक म्हणाले, पांडुरंग कारखान्याचे नाव आता 'कर्मयोगी सुधाकपंत परीचारक पांडुरंग सहकारी साखर कारखाना' असे करण्यात आल्याने सभासदांची नामविस्ताराची इच्छा पूर्ण झाली आहे. मात्र त्यांच्या नावाला साजेसे काम करण्याची जबाबदारी आपली वाढली आहे. सुरुवातीच्या काळात दैनंदिन १ हजार टन ऊस गाळप करणारा आपला कारखाना, प्रती दिन १० हजार मेट्रिक टन ऊस गाळप करण्याच्या क्षमतेसह सुसज्ज होत आहे. कारखान्याच्या या नेत्रदिपक प्रगतीमागे श्रद्धेय सुधाकरपंत परीचारक यांचे योगदान, आपल्याला विसरता येणार नाही.

यावेळी कार्यकारी संचालक डॉ यशवंत कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक केले.

या नामविस्तार सोहळ्यासाठी आवर्जून उपस्थित असलेले पंजाबराव डख यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना येणाऱ्या २०२३ च्या हंगामात पाऊस भरपूर पडणार असल्याची ग्वाही दिली, देशात ८ जूनला मान्सूनचे आगमन होऊन महाराष्ट्रात २२ जूनला महाराष्ट्रभर पाऊस पडणारआहे. दरवर्षी २७,२७ जूनला पेरणी होणार १० जुलै ते १५ जुलै सर्वत्र पाऊस, १९ जुलै ते २६ जुलै ८०टक्के पाऊस १६ सप्टेंबर ते २३ सप्टेंबर ८० टक्के पाऊस त्याचबरोबर जुलै आणि ऑगस्ट मध्ये सह पावसाळ्यात चांगला पाऊस पडणार असून शेतकरी बांधवांनी दुष्काळाची काळजी करू नये २०२२ एवढाच २०२३ मध्ये धोधो पाऊस पडणार आहे असा ठाम विश्वास पंजाबराव डक यांनी व्यक्त केला .



या सोहळ्यासाठी कारखान्याचे संचालक दिनकरराव मोरे, वसंतराव देशमुख, बाळासाहेब सालविठ्ठल, दिलीपराव चव्हाण, दाजी पाटील, हरीष गायकवाड, उमेशराव परिचारक, ज्ञानदेव ढोबळे, तानाजीराव वाघमोडे, बाळासो यलमार, भगवान चौगुले, लक्ष्मण धनवडे, भास्कर कसगावडे, भैरु वाघमारे, गंगाराम विभुते, सुदाम मोरे, विजय जाधव, हणमंत कदम, किसन सरवदे, शामराव साळुंखे, मधुकर पाटील आदी उपस्थित होते. डॉ. सुधीर पोफळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर कारखान्याचे उपाध्यक्ष कैलास खुळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## शेंद्रीनजीक अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

**सुराज्य/बार्शी**

बार्शी-कुर्डवाडी रस्त्यावर शेंद्री नजीक ट्रक व मोटरसायकल यांच्या अपघातात मोटारसायकल वरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. गुरुवार दि ३० रोजी दुपारी ३.३० च्या च्या सुमारास ही घटना घडली. मधुसुदन मुरलीधर जाधव (वय २६) व ऋषिकेश संतोष जाधव (वय १९) (दोघे रा लक्ष्मी टाकळी, ता.पंढरपूर जि.सोलापूर) अशी अपघातातील मयतांची नावे आहेत.

अपघात नेमका कसा झाला याबाबत अधिक माहिती मिळू शकली नाही. अपघातानंतर बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

## भाविकांच्या वैद्यकीय सोयीसाठी सहा औषधोपचार केंद्र

### सुसज्ज ६ रुग्णवाहिका, १२० आरोग्य अधिकारी कर्मचारी

**पंढरपूर** : चैत्री यात्रेमध्ये पंढरपूरात येणारे भाविक आरोग्यसंपन्न रहावे. तसेच यात्रा कालावधीत येणाऱ्या भाविकांना आवश्यक वैद्यकिय सेवा पुरविण्यासाठी आरोग्य यंत्रणा असून, भाविकांच्या वैद्यकीय सुविधेसाठी ६ ठिकाणी औषधोपचार केंद्र उपभारण्यात आले असून, त्यामध्ये १२० आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत सेवा देण्यात आहे.

तसेच शहरात ७ ठिकाणी सर्व सुविधायुक्त ६ रुग्णवाहिकेची सेवा उपलब्ध करुन देण्यात आल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ यांनी दिली. चैत्री यात्रेच्या कालावधीत आरोग्याची आवश्यक काळजी घेण्यासाठी वैद्यकिय उपजिल्हा रुग्णालय, नगरपालिका आरोग्य विभाग तसेच तालुका आरोग्य विभागाकडून पत्राशेड, वाळवंट, दर्शन मंडप, पोलीस संकुल, ६५ एकर, गोपाळपूर येथे औषधोपचार केंद्र सुरु करण्यात आली आहेत.

आवश्यकतेनुसार रक्तपेढीची सोय करण्यात आलेली आहे. संपूर्ण आरोग्य यंत्रणा रुग्णासआरोग्यसेवा देण्यास तत्पर आहे. उपजिल्हा रुग्णालयात ऑक्सीजन बेड, आयसीयू विभाग तयार करण्यात आला असल्याचे डॉ. बोधले यांनी सांगितले.

## महापालिकेच्या नगर अभियंतापदी चलवादी तर आरोग्य अभियंतापदी राठोड

**सुराज्य/सोलापूर**

महापालिका आयुक्त शितल तेली उगले यांनी केलेल्या जम्बो प्रमोशनमुळे महापालिकेला तीन कार्यकारी अभियंता लाभले आहेत कार्यकारी अभियंता पदी लक्ष्मण चलवादी, विजयकुमार राठोड व राजेश परदेशी यांना पदोन्नती मिळाली आहे.

यामध्ये प्रभारी नगर अभियंता लक्ष्मण चलवादी, पाणीपुरवठा विभागातील विजयकुमार राठोड व विद्युत विभागातील सहाय्यक अभियंता राजेश परदेशी यांना कार्यकारी अभियंतापदी प्रमोशन मिळाले आहे.दरम्यान, सार्वजनिक आरोग्य अभियंतापदी विजयकुमार राठोड, नगर अभियंता पदी लक्ष्मण चलवादी यांची वर्णी लागली आहे. तर विद्युत विभाग कार्यकारी अभियंता पदी राजेश परदेशी यांना लॉटरी लागली आहे. सफाई अधीक्षकपदी चराटे व श्रीराम कुलकर्णी यांना पदोन्नती मिळाली आहे. वीज पर्यवेक्षक असलेले इंगळे यांना विद्युत विभागाचे सहाय्यक अभियंतापदी पदोन्नती दिली आहे.



## 'मनोरमा'च्या राम भक्तीत रंगले गीतरामायण

**सुराज्य/सोलापूर**

राम राम जन्मला गं सखे, राम जन्मला, स्वयें श्री रामप्रभू ऐकती कुश लव रामायण गाती, शरयू तीरावरी, दशरथा घे पायस दान, सेतू बांधा रे,' या अशा अनेक सुमधूर गीतांनी रसिक श्रोते भक्तिरसात न्हाऊन गेले. निमित्त होते श्रीरामनवमीनिमित्त आयोजित गीतरामायणाचे.

मनोरमा मल्टिस्टेट, मनोरमा सोशल फाउंडेशन, अस्मिता व्हिजन न्यूज चॅनेल यांच्या संयुक्त विद्यमाने ग. दि. माडगूळकर लिखित आणि सुधीर फडके रचित गंधार प्रतिष्ठान प्रस्तुत अतुल बेले आणि सहकलाकारांचा गीतरामायणाचा कार्यक्रम गुरुवारी सायंकाळी हुतात्मा स्मृती मंदिरात पार पडला.

प्रमुख पाहुणे म्हणून माजी सहकारमंत्री हर्षवर्धन पाटील होते. अध्यक्षस्थानी मनोरमा परिवाराचे मार्गदर्शक, चेअरमन श्रीकांत मोरे होते. शंखनादाने कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.

व्यासपीठावर मनोरमा सखी मंचच्या अध्यक्षा शोभा मोरे, कार्यक्रमाच्या संयोजिका व मनोरमा साहित्य मंडळीच्या उपाध्यक्षा अस्मिता सुरेश गायकवाड, डॉ. सुमित मोरे, डॉ. ऋचा मोरे, ॲड. सुरेश गायकवाड, माजी शिक्षणाधिकारी प्रदीप मोरे, संचालक संतोष सुरवसे, मनोरमा बँकेच्या सीईओ शिल्पा कुलकर्णी, मल्टिस्टेटच्या सीईओ कविता कुलकर्णी उपस्थित होते. आलेल्या सर्व महिलांचे गुलाबपाणी शिंपडून, हळदी-कुंकू लावून स्वागत करण्यात आले.यावेळी सौ. अस्मिता गायकवाड यांनी स्वागत केले. सौ. शोभा मोरे यांनी प्रास्ताविक केले.

चेअरमन श्रीकांत मोरे म्हणाले, तुमच्या आमच्या जीवनात रामराज्य आणण्याचे प्रयत्न मनोरमा परिवार करत आहे. अनेक सामाजिक उपक्रम परिवाराकडून राबवले जात आहेत.'

माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी, नव्या पिढीला प्रभू रामचंद्र कोण होते, वरिष्ठांचा मान-सन्मान कसा राखावा, मर्यादित संकल्पना कशा ठेवाव्यात, याबद्दल सांगून मनोरमा परिवार गरजू माणसाला आर्थिक पाठबळ देण्याचे काम करत आहे, असे सांगितले. गीतरामायण कार्यक्रमाचे निवेदन कौस्तुभ गोडबोले यांनी केले. श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले. रसिक श्रोत्यांनी हुतात्मा स्मृती मंदिर भरून गेले होते.

## चोरून वाळू वाहतूक करणारा टेम्पो जप्त

**सुराज्य/सांगोला**

तालुक्यातील वाढेगाव जवळील माण नदीतून ३१ मार्च रोजी मध्यरात्री दोनच्या सुमारास टेम्पोतून चोरून वाळू वाहतूक करीत असताना सरपंच यांनी पकडून सांगोला पोलिसांच्या ताब्यात दिला व टेम्पो व वाळू सह तीन लाख आठ हजार रुपये किमतीचा टेम्पो जप्त करून चालकावर सांगोला पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की गुरुवारी रात्री पावणेदोनच्या सुमारास वाडेगाव चे सरपंच नंदकुमार शिवाजी दिघे व शरद संभाजी पवार हे दोघेजण पवार वस्तीजवळ थांबले असता एक टेम्पो तेथून जात असता त्याच थांबण्यास सांगितले.

तो टेम्पो थांबला त्या टेम्पो त बॅटरीने पाहिले असता वाळू दिसून आली सरपंच दिघे यांनी त्वरित पेट्रोलिंगला असलेले सहाय्यक फौजदार भातुंगडे यास फोनवरून माहिती दिली ते त्वरित घटनास्थळी आले व टेम्पो पाहिले असता वाळू दिसून आली त्यांनी टेम्पो त्याची किंमत तीन लाख रुपये व वाळू एक ब्रास त्याची किंमत आठ हजार रुपये असे तीन लाख आठ हजार रुपयांचा माल जप्त केला.

टेम्पो चालक सुधीर गोपीनाथ वाघमारे वय २१ राहणार सोनलवाडी तालुका सांगोला याचे वर भादवि कलम ३७९ सह पर्यावरण कायदा कलम ९ व १५ प्रमाणे पोलीस वाहनाचे चालक सुनील लोंढे यांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहेत.

## अंकुर साहित्य संघाचे राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर

**सुराज्य/सोलापूर**

नवोदित साहित्यिकांचे विचारपीठ असलेल्या अंकुर साहित्य संघ सोलापूरच्या वतीने सालाबाद प्रमाणे यंदाही राज्यस्तरीय साहित्य व राज्यस्तरीय समाजसेवक पुरस्कार देण्यात येत असून सन२०-२१ व२१-२२ या दोन वर्षात प्रसिद्ध झालेल्या साहित्य कलाकृतींना हे पुरस्कार घोषित झाल्याची माहिती केंद्रीय उपाध्यक्ष पत्रकार भरतकुमार मोरे व जिल्हाध्यक्ष कवी नागनाथ गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा पुरस्कार वितरण सोहळा दि. ९ एप्रिल रोजी दुपारी १ते ५ या वेळेत रंगभवन चौकातील समाज कल्याण केंद्र येथे प्रख्यात साहित्यिक प्रा.डॉ. सारीपुत्र तुपेरे यांच्या हस्ते व महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अध्यक्षा प्रा.डॉ. श्रुतीश्री वडगबाळकरयांच्या अध्यक्षतेखाली तसेच दलित मित्र आप्पासाहेब जाधव गुरुजी (पुणे) काव्यप्रेमींचे संस्थापक आनंद घोडके, अंकुर साहित्य संघाचे प्रदेशाध्यक्ष हिंमत ढाले, कार्याध्यक्ष तुळशीराम बोबडे, रिपाई प्रदेशाध्यक्ष सुबोध वाघमोडे या मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. कवी नागनाथ गायकवाड साहित्य गौरव पुरस्कार २०-२१ कवी प्रकाश जडे (मंगळवेढा), सन २१- २२ या वर्षाकरिता सोलापुरातील विद्रोही कवी प्रमोद लांडगे(सोलापूर), कवयित्री. प्रा.अंजना गायकवाड, उदगीर येथील अंबादास केदार यांच्या तारांबळ या आत्मचरित्रास तसेच २०२१ -२२ या सालात प्रसिद्ध झालेल्या डॉ . खंडेराव शिंदे (कोल्हापूर) यांच्या पकाल्या या आत्मचरित्रास तसेच सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी पोपट श्रीराम काळे (पुणे) यांच्या काजवा या दोन आत्मचरित्रास हा पुरस्कार विभागून दिला जाणार आहे. रोख रक्कम, गौरवचिन्ह, प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे, असे केंद्रीय उपाध्यक्ष भरतकुमार मोरे व जिल्हाध्यक्ष नागनाथ गायकवाड यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेत शहराध्यक्ष विकास कस्तुरे, कवी रामप्रभू माने, अंबादास जाधव आदी उपस्थित होते.

## स्व.ब्रह्मानंद मोरे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त ५ एप्रिलला विविध कार्यक्रम

**सुराज्य/अक्कलकोट**

अक्कलकोट तालुक्यातील लोकनेते स्व.ब्रह्मानंद कृष्णात मोरे यांच्या २४ व्या पुण्यस्मरणानिमित्त दि.५ एप्रिल रोजी विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब मोरे यांनी दिली.

दरवर्षी मोरे प्रतिष्ठानच्यावतीने रक्तदान शिबिर, गोरगरिबांना मदत, कृषी प्रदर्शन, शेतकरी मेळावा, काव्यसंमेलन,कीर्तन असे अनेक उपक्रम राबविले जातात.कोरोना काळात अनेक उपक्रम राबवून प्रतिष्ठानने सामाजिक कार्य केले आहे.

यंदा रक्तदान व कीर्तन आयोजित करण्यात आले आहेत.बुधवारी,सकाळी १० वाजता बादोला रोडवरील अंबाबाई मंदिर येथे तहसीलदार बाळासाहेब सिरसट यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उद्घाटन होणार आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उद्योजक विश्वनाथ भरमशेट्टी हे राहणार आहेत.यावेळी गावातील भास्कर मोरे, नीलप्पा लोहार, संतोष काळे, बापूराव सुरवसे, नागनाथ कोकरे, रामचंद्र कोळी या माजी सैनिकांचा पुरस्कार देऊन गौरव होणार आहे. कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन मेजर प्रशांत मोरे यांच्या हस्ते होणार आहे.

सायंकाळी ६ वाजता जिल्हा परिषद शाळेच्या प्रांगणामध्ये ह.भ.प शिवलीलाताई पाटील महाराज (बार्शीकर) यांचे विनोदी कीर्तन होणार आहे.या कीर्तन सोहळ्याचे उद्घाटन आमदार गोपीचंद पडळकर यांच्या हस्ते होईल. प्रतिमापूजन मूर्तिजापूरचे आमदार हरीश पिंपळे यांच्या हस्ते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विजयकुमार देशमुख हे राहणार आहेत.या कार्यक्रमास



माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी,गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर प्रमोद मोरे,ज्येष्ठ नेते प्रभाकर मजगे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे,माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे,माजी पंचायत समिती सदस्य तुकाराम बिराजदार, माजी उपसभापती स्वामीराव पाटील, माजी सरपंच विनायक पाटील, ह.भ.प आबा महाराज कुरनूरकर, बाबासाहेब वि.पाटील, ह.भ.प. बाबुराव शिंदे महाराज आदी मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष विनोद मोरे यांनी केले आहे.

### गुणी जणांचा होणार गौरव

यावेळी सुरेखा सुरवसे (आदर्श माता), आबा मोरे (आदर्श शेतकरी), समर्थ काळे (आदर्श व्याख्याता), मनोज बंडगर (वैद्यकीय सेवा), सचिन पवार (आदर्श पत्रकार), रानबा काळे (समाजसेवक), संजय गवळी (आदर्श शेतमजूर) तसेच निशा मोरे, कार्तिक शितोळे, श्रद्धा मोरे यांचा गुणवंत विद्यार्थी म्हणून सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

# चैत्री यात्रेसाठी पंढरपूर नगरपालिका व पोलीस प्रशासन सज्ज

## स्वच्छतेसाठी शहराचे सहा विभाग; ११४८ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

सुराज्य/पंढरपूर

चैत्री शुद्ध एकादशी ०२ एप्रिल रोजी असून, चैत्री यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी परराज्यासह राज्यातील इतर जिल्ह्यातून सुमारे ४ ते ५ लाख भाविक येतात. यात्रा कालावधीत भाविकांच्या व स्थानिक नागरिकांच्या आरोग्य सुरक्षितेच्या व स्वच्छतेच्या दृष्टीने नगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करण्यात आल्या असल्याची माहिती मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी दिली.

चैत्री यात्रा कालावधीत स्वच्छतेसाठी मंदीर परिसर, संतपेठ, स्टेशन रोड, जुनी पेठ-गोविंद पुरा, नविपेठ-इसबावी, मनिषा नगर-इसबावी असे पंढरपूर शहराचे ६ विभाग केले असून, स्वच्छतेसाठी



११४८ स्वच्छता कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली असून यामध्ये ३४८ कायम तर ८०० हंगामी कर्मचारी नेमण्यात आले आहेत. भाविकांना स्वच्छ पिण्याचा पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी शहरातील सार्वजनिक बोरवेल, हातपंप आदी ठिकाणच्या पाण्याची तपासणी करण्यात आली आहे. तसेच शहरासह ६५ एकर, वाळवंट, पत्राशेड, दर्शन रांग, नदी वाळवंट आदी ठिकाणी जंतनाशक फवारणीसह ,मॅलेथॉन पावडर, ब्लिचिंग पावडर वेळोवेळी टाकण्यात येत आहे. घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत डम्पिंग ट्रॉल्या, कॉम्पॅक्टर, कंटेनर, घंटागाडी, जेसीबी, टीपर आदी वाहनांच्या माध्यमातून दररोज सुमारे ५५ ते १०० टन कचरा गोळा करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

त्याचबरोबर पत्राशेड, वाळवंट ६५ एकर परिसर, रेल्वे मैदान ठिकाणी तात्पुरते २५० शौचालय उभारण्यात आली आहेत. वारकरी भाविकांनी उघड्यावर शौच विधी करू नये म्हणून प्रतिबंधक पथकांची नेमणूक देखील करण्यात आली आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील जीर्ण व धोकादायक इमारतींना नोटीसा देण्यात आल्या असून, वाहनतळावरती दिशादर्शक फलक लावण्यात आले आहेत.

आवश्यक ठिकाणी बॅरेकेटींग करण्यात आले असल्याची माहिती मुख्याधिकारी माळी यांनी दिली. कालावधीमध्ये स्थानिक नागरिकांनी व भाविकांनी आरोग्य सुव्यवस्थीत राहण्यासाठी नगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहनही मुख्याधिकारी माळी यांनी यावेळी केले आहे.

### भाविकांच्या सुरक्षेला प्राधान्य : उपविभागीय पोलीस अधिकारी कदम



पंढरपूरः चैत्र शुद्ध एकादशी ०२ एप्रिल २०२३ रोजी असून, या चैत्री यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या प्रमाणात येतात. वारीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षितपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम यांनी दिली.

चैत्री वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियंत्रणासाठी ०१ हजार २६ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ०३ पोलीस उपअधिक्षक, १२ पोलीस निरिक्षिक, ४४ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ३८९ पोलीस कर्मचारी व ४%९ होमगार्ड व एसआरपीएफ कंपनीची तुकडी नियुक्त करण्यात आली आहे. तसेच वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी ०२ पोलीस निरिक्षक व ९७ पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सहा ठिकाणी वॉच टॉवर व १३० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी १० ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली असल्याचेही श्री.कदम यांनी सांगितले. भाविकांनी नागरिकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनास सहाकार्य करावे असे, आवाहनही उपविभागीय पोलीस अधिकारी कदम यांनी केले आहे.

# जी-२० च्या धर्तीवर शिवरत्न झीलची सुरुवात

सुराज्य/अकलूज




आ.रणजितसिंह मोहिते-पाटील व धैर्यशिल मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनपर शिवरत्न शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा यांच्या कल्पनेतून भारताच्या जी २० भारताच्या अध्यक्षपदाची व परिषदेच्या थीमवर अधारीत शिवरत्न शिक्षण संस्था व श्री शिवपार्वती विकास ट्रस्ट च्या महाविद्यालयांचा शिवरत्न झील २०२३ या क्रीडा सांस्कृतिक फेस्टिवलचा आरंभ धैर्यशील मोहिते-पाटील व शितलदेवी मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या उद्घाटना प्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील म्हणाल्या भारताने 'जी-२०' चे अध्यक्षपद स्वीकारले आहे. प्रथमच जी-२० देशाच्या नेत्यांची परिषद भारतात आयोजित होणार असून ही सर्व भारतीयांसाठी अभिमानाची बाब आहे. जागतिक स्तरावरील समस्यांवर व्यावहारिक उपाय शोधण्याच्यादृष्टीने भारताचे अध्यक्षपद महत्वाचे ठरणार आहे. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्रात परिषदेचे आयोजन होत असल्याने त्याला वेगळे महत्व आहे. भारताच्या अध्यक्षपदाच्या काळात वसुधैव कुटुंबकम ही संकल्पना स्वीकारण्यात आली आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात भारताकडे जी-२० चे अध्यक्षपद येणे विशेष गौरवाची बाब आहे. मानवकल्याण, शांततापूर्ण सहचर्य आणि शाश्वत विकासाच्या ध्येयावर आधारीत भारताची भूमिका त्यानिमित्ताने जागतिक स्तरावर प्रभावीपणे पोहोचू शकेल. यंदाचा शिवरत्न झील २०२३ फेस्टीवल ३१ मार्च ते १० एप्रिल पर्यंत चालणार आहे, या दहा दिवसात मड हंट, रांगोळी, ग्राफिक्स डिजाईन, मेंहदी चेस,बॅडमिंटन,वादविवाद स्पर्धा, क्रिकेट, केस स्टडीज, प्रोजेक्ट प्रेझेन्टेशन,इंस्टाग्राम रिल्स मेकिंग, क्रीडा सांस्कृतिक स्पर्धा व कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे या सर्व क्रीडा सांस्कृतिक प्रकारात ग्रीनफिंगर्स कॉलेज, विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालय, शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या तीन महाविद्यालयाचे एकूण ४०० पेक्षा अधिक विद्यार्थी या विविध स्पर्धेत सहभागी होणार आहेत. यावेळेस संस्थेचे सचिव धर्मराज दगडे,नितीन बनकर,श्रीकांत राऊत, दत्तात्रय लिके, शिवदत्त नारायणकर, पराग गायकवाड, शितल मगदूम, डॉ.अरविंद कुंभार, डॉ.महेश ढेंबरे, डॉ.मेरी सुमती, अश्रफ शेख, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी व इतर मान्यवर उपस्थित होते. व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षकेत्तर, विद्यार्थी उपस्थित होते.

# सांगोला नगरपालिकेच्या विकासकामांकरिता ५ कोटी रुपये मंजूर : आ.शहाजीबापू

### नवीन मटन मार्केटसाठी दीड कोटी तर विद्युत शवदाहिनीसाठी एक कोटी रुपये मंजूर

सुराज्य/सांगोला

सांगोला नगरपरिषदेच्या विविध विकास कामांकरिता महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाकडून पाच कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.

यामध्ये प्रामुख्याने १) मटन मार्केट फेज २ साठी दीड कोटी २) हिंदू स्मशानभूमी येथे विद्युत शवदाहिनीसाठी बसविणे १ कोटी ३) मिरज रोड देविदास बाबर घर ते फिरोज शेख घर ते ओढ्यापर्यंत आरसीसी पाईप गटार करणे ११ लाख ४) बनकर वस्ती येथे भीमराव बनकर घर ते सैफन बागवान मळा ते संजय बनकर घर ते अक्षय जावीर घर ते माने प्लॉटपर्यंत रस्ता खडीकरण डांबरीकरण करणे ३० लाख ५) आरक्षण क्र २४ येथील चौक सुशोभीकरण करणे १६ लाख ६) चिंचोली रोड स. न. ५१५ ते पूर्वेस फॅब्रटेक कॉलेज कडे जाणारा ९.०० मी रुंदीचा डीपी रस्ता करणे ७३ लाख ७) सांगोला नगरपरिषद मालकीचा कचरा डेपो येथील अंतर्गत रस्ते करणे ५० लाख ८) वाढेगाव रोड पाण्याच्या टाकीस चौकीदार निवास बांधणे व पेव्हिंग ब्लॉक बसवणे २५ लाख ९) पंढरपूर रोड पाण्याच्या टाकीस चौकीदार निवास बांधणे व पेव्हिंग ब्लॉक बसवणे २५ लाख १०) नवीन जलशुद्धीकरण केंद्र येथे पेव्हिंग ब्लॉक बसवणे १०लाख ११) जुने जलशुद्धीकरण केंद्र येथे पेव्हिंग ब्लॉक बसवणे १० लाख असे एकूण पाच कोटी रुपये मंजूर झाले आहेत.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून सांगोला नगरपालिकेसाठी आतापर्यंत सुमारे ६० ते ७० कोटी रुपयांचा निधी दीड मागील वर्षामध्ये मिळाला असून यामध्ये शहरातील अनेक विकास कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. या पुढील काळातही शहरातील भुयारी गटारीसह अनेक विकासकामांना भरघोस निधी मिळणार असून सांगोला शहराचा चेहरा मोहरा बदलविणार असल्याची ग्वाही आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.





## महुद जि.प.शाळेत विज्ञान प्रदर्शन

सांगोला : जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, महुद बु शाळेत विज्ञान प्रदर्शन भरवण्यात आले, या प्रदर्शनात इयत्ता पाचवी ते सातवी मधील विद्यार्थ्यांनी आपले विविध प्रयोग सादर केले. या विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन समयी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास खबाले, उपाध्यक्ष- उमा सरतापे, शकील तांबोळी, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य संजय पाटील, संतोष पाटील, सुनील जाधव, अर्चना चव्हाण, दीपक पवार, महूद शाळेचे मुख्याध्यापक विश्वनाथ जाधव, केंद्रप्रमुख रवींद्र पाटील सर, उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महूद शाळेतील- संजयकुमार भोसले, मीनाक्षी टकले मॅडम, महादेव नागणे, सुलभा भांबुरे, कमल खबाले, सौ सरोजिनी देशमुख, संगीता केसकर मॅडम, सौ शितल चव्हाण या शिक्षक वृंदांचे अनमोल असे सहकार्य लाभले. इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना शंकर कांबळ, सुनंदा चव्हाण, शोभा पाटील, वंदना पाटणे, दऱ्याबा येडगे सर या वर्ग शिक्षकांनी प्रयोग सादरीकरणासाठी मार्गदर्शन केले आभार प्रदर्शन महादेव नागणे सर यांनी मानले

## डॉ.आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी वाघमारे

पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समितीच्या सन २०२३ च्या अध्यक्षपदी अमोल सोमनाथ वाघमारे,उपाध्यक्षपदी शांतिनाथ (बापू) अशोक कांबळे तर खजिनदारपदी रोहित भगवान वाघमारे यांची सर्वानूमते निवड करण्यात आली. शुक्रवार दिनांक ३१ मार्च रोजी जयंती महोत्सव समितीच्या वतीने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या बैठकीमध्ये सदरच्या निवडी करण्यात आल्या समाजाव्यतिरिक्त गावातील व पंचक्रोशीतील एकाही व्यक्तीकडून जयंतीच्या नावाखाली कोणी पैशाची मागणी करीत असेल तर सदर व्यक्तीवर पिलीव पोलीस स्टेशनमध्ये खंडणीचा गुन्हा दाखल करावा अन्यथा जयंती उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांशी संपर्क साधावा असे जयंती उत्सव समितीचे नवनियुक्त अध्यक्ष अमोल वाघमारे यांनी बैठकीमध्ये बोलताना सांगितले. बैठकीमध्ये सिद्धार्थ नगर,भिम नगर व पंचशील नगर येथील भीमसैनिक उपस्थित होते.कायद्याच्या चौकटीत राहूनच सर्व काही उपक्रम राबवले जातील असा सर्वानूमते निर्णय घेण्यात आला.

## महिलेने छातीवर बसून महिलेचा दात पाडला

सोलापूर : मागील झालेल्या भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करून तसेच दमदाटी करून हंसाबई जाधव यांनी फिर्यादी यल्लुबाई चव्हाण यांचे केस धरून खाली पाडले.त्यानंतर शितल जाधव यांनी फिर्यादी यांच्या छातीवर बसून ठोसा मारत दात पाडून जखमी केल्याची घटना दि.३० मार्च रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर १ येथे घडली.यल्लूबाई रमेश चव्हाण (वय-५०,रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ३) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून हंसाबाई शंकर जाधव व शितल विकास जाधव (रा.सोलापुर) या दोघांविरुद्ध सलगर वस्ती पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## विवाहितेचा छळ; आठजणांवर गुन्हा

सोलापूर : घरगुती कारणावरून तसेच आम्हास हुंडा दिला नाही व मानपान केला नाही असे म्हणत तुझ्या आई-वडिलांकडून हुंडा म्हणून एक लाख रुपये घेऊन ये असे बोलून विवाहितेला मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी पतीसह ८ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी अनिता कुंभार (वय-२८, रा.ओम नमः शिवाय) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती शंकर कुंभार, उमेश कुंभार, जाऊ गीता उमेश कुंभार, आजोबा सदाशिव कुंभार, आजी भागव्या कुंभार (वय-६५), पतीचे चुलत भाऊ उमेश कुंभार, संतोष कुंभार, पतीचे भाऊजी निगप्पा कुंभार (सर्व.रा.निडाणी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

# नातेपुते नगरपंचायत क्षेत्रातील पूर्वीपासून राहत असणाऱ्या घरांच्या नोंदी होण्यासाठी नगरपंचायतीस निवेदन

सुराज्य/नातेपुते

महाराष्ट्र शासन गट नंबर ७१९ येथे राहत असणारे रहिवासी यांच्या घराची शासकिय दप्तरी नोंद लागावी यासाठी निवेदन तयार करून सदर निवेदन शिवसेनेचे माळशिरस तालुका प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांनी नातेपुते नगरपंचायतीचे प्रशासक तथा मुख्याधिकारी माधव खांडेकर यांना दिले.

यावेळी महाराष्ट्र शासन गट नंबर ७१९ येथे राहत असणारे नागरिक उपस्थित होते.

नातेपुते येथील प्रभाग १७ समाजभूषण नगर मधील रहिवासी नागरिक गेले ५० वर्षापासून महाराष्ट्र शासन गट नंबर ७१९ या ठिकाणी आपले घरे करून राहत आहेत. परंतु अद्याप त्या घराच्या नोंदी कोणत्याही दप्तरी कार्यालयात नोंद नाहीत. त्या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या घरांना विद्युत मीटर पाण्यासाठी नळ कनेक्शन



इतर सुविधा मिळाल्या आहेत.घरांच्या नोंदी नसल्याने घर नंबर नगरपंचायत कार्यालयास नोंद नाही. घराच्या नोंदीसाठी तेथील नागरिकांनी अनेक प्रयत्न केले. जिल्हाधिकारी, प्रांत अधिकारी या ठिकाणी लागणाऱ्या कागदपत्राची पूर्तता केली परंतु त्याबाबत कोणतीही दखल घेण्यात आली नाही. तेथील रहिवासी मारुती साळुंखे, सुरेश शिवलिंग तवटे, जहांगीर मुबारक मुलाणी,सुहास धोंडीराम खटावकर, सुहास देशमुख, संतोष धोंडीराम खटावकर, विनायक अंकुश सुर्वे, मोशीन ताजुद्दीन मुलाणी, दिनेश कांबळे, रमेश नारायण पंडित, दादा कादर इनामदार, शरीफ यासीन काझी, जुम्मन कदर शेख, संदीप साळुंखे राम आनंद सर्जे, राजेंद्र माधव भरते, संजय भरते, हरि गोरक्ष गुजर, संतोष सुरेश केसकर, दत्तात्रय कमलाकर दिक्षित, दत्तात्रय रामभाऊ अदमाने,दिपक राऊत, अमोल सुर्यकांत नकाते, हसीना ईसाक लिगाडे, विष्णूब सोनवले, संभाजी दगडू पवार अनिल हनुमंत तारळकर, गणेश बबन सोनवले गणेश गोविंद लकडे या सर्वांनी नातेपुते येथील शिवसेना कार्यालयास भेट देऊन माळशिरस तालुक्याचे शिवसेना प्रमुख राजकुमार हिवरकर पाटील यांना वरील घर नोंदणीबाबत अर्ज देऊन तक्रार मांडली.

> नातेपुते नगरपंचायत हद्दीत ५० वर्षाहून अधिक वास्तव्यास असणाऱ्या नागरिकांच्या अनेक घरांच्या शासकीय दप्तरी नोंदी नाहीत. घरांच्या नोंदी शासकीय दप्तरी नसल्याने अशा नागरिकांना घरकूल योजनेपासून वंचित राहावे लागते. नातेपुते नगरपंचायत चे प्रशासक तथा मुख्य अधिकारी यांनी सदर घरांचा सर्वे करून नगरपंचायतीला नोंदी करून घ्याव्या जेणेकरून अशा अनेक घरांच्या घरपट्टी पाणीपट्टी च्या माध्यमातून नगरपंचायतीला महसूल उपलब्ध होईल.
>
> **- राजकुमार हिवरकर पाटील**
> (माळशिरस तालुका शिवसेना प्रमुख)

# अतिवृष्टीची भरपाई आता नव्या निकषाप्रमाणे

## शासन आदेश जारी; २०२५ पर्यंत लागू राहणार

सुराज्य/सोलापूर

राज्य आपत्ती मदत निधीचे सुधारित दर राज्य शासनाने जाहीर केले आहेत. अतिवृष्टी, गारपीट आदी नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीची नव्या दराप्रमाणे २५ टक्के वाढी भरपाई मिळणार आहे. २००५ पर्यंत हे आदेश लागू राहणार आहेत. एकूण १२ आपत्तीचा समावेश यामध्ये करण्यात आला आहे. याबाबतचा शासन आदेश जारी करण्यात आला आहे. नव्या आदेशामुळे आता निकषाच्या पलिकडेजाऊन मदत मिळणार आहे.



महसूल व वन विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. एकूण १२ प्रकारच्या भरपाईचे सुधारित दर जाहीर केले आहेत.नैसर्गिक आपत्तीच्या नुकसान भरपाईत सुधारणा करावी अशी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे आग्रही मागणी केली होती. त्यानुसार केंद्राने ऑक्टोबर महिन्यात सुधारित निकषांना मान्यता दिली होती. भरपाईचे हे सुधारित दर २०२२ ते २०२५ पर्यंत लागू राहणार आहेत. मार्च महिन्यात राज्याच्या अनेक जिल्ह्यांत अवकाळी व गारपीट झाली. हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले होते. या भरपाईला आता सुधारित दराने नुकसान भरपाई मिळण्याची शक्यता आहे. मविकास आघाडी सरकाने दोन हजारची वाढ केली होती. तर शिंदे -फडणवीस सरकारने अपवादात्मक स्थिती मदत दिली जाहीर केली होती. २ हेक्टर ऐवजी तीन हेक्टरपर्यंत वाढवली. तसेच कोरडवाहू पिकांना १३ हजार ६०० प्रति हेक्टर, बागायतीला २७ हजार आणि इतर पिकांना ३६ हजार अशी दुप्पट मदत दिली होती.

> **प्रचलित दरानुसार जिरायती पिकांना प्रतिहेक्टरी ६८०० रुपये भरपाई मिळत होती ती आता ८५०० मिळेल. बागायती पिकांना प्रतिहेक्टरी १३,५०० मिळत होती, सुधारित दराने प्रति हेक्टर १७,००० रुपये मिळेल. बहुवार्षिक पिकांना प्रतिहेक्टर १८,००० रुपये भरपाई देण्यात येत होती, आता प्रतिहेक्टर २२.५०० रुपये मिळतील.**

### असे आहेत सुधारीत दर

**मृत व्यक्ती ४ लाख, अवयव निकामी झाल्यास ७४ हजार ते अडीच लाख, जखमी व्यक्ती १६ हजार रुपये, घर पाण्यात बुडाल्यास २५०० रुपये प्रति कुटुंब, शेतीत गाळ झाल्यास हेक्टरी १८००० रुपये, जमीन खरडल्यास ४७ हजार हेक्टरी, कोरडवाहू पीक ८५०० रुपये प्रतिहेक्टर (२ हेक्टर मर्यादा), बागायती पीक १७ हजार प्रति हेक्टर (२ हेक्टर मर्यादा), बहुवार्षिक पीक २२५०० रुपये प्रति हेक्टर (२ हेक्टर मर्यादा), दुधाळ म्हैस ७५०० रुपये प्रति जनावर, मेंढी ४००० प्रति, बैल ३२००० प्रति अशी मदत मिळेल.**



## शेतातून रस्ता का मागतो म्हणून मारहाण

सांगोला : तालुक्यातील महिम गावाखालील कारंडे वाडी येथील सिद्धेश्वर पोपट लोखंडे (वय ३०) यास शेतातून रस्ता का मागतो या कारणास्तव संतोष लोखंडे सह इतर तिघांनी लोखंडी गजाने मारहाण करून जखमी केल्याच्या कारणावरून सांगोला पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की गुरुवारी सायंकाळी पाचच्या सुमारास सिद्धेश्वर लोखंडे हे आपल्या स्वतःच्या घरात कुटुंबीयासमवेत होते त्यावेळी शेजारी राहणारे संतोष दिलीप लोखंडे विनायक शामराव लोखंडे गणेश शामराव लोखंडे दिलीप संगाप्पा लोखंडे हे घरासमोर आले व म्हणाले की तू शेतातून रस्ता सारखा का मागतो म्हणून लोखंडी गजाने मारहाण केली तसेच भांडण सोडण्यासाठी गेलेले मेहुना सतीश सुकटे सासू नवनिता सुकटे हे मध्ये गेल्या असता यांनाही मारहाण केली तसेच सासरे व पत्नी अर्चना ही भांडण सोडण्यासाठी गेले असता त्यांना ढकलून दिले जर रस्त्याचा विषय पुन्हा घेतल्यास तुला जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देऊन शिवीगाळ केली आहे सध्या सिद्धेश्वर लोखंडे हे सांगोला येथील खाजगी दवाखान्यात उपचार घेत आहे तर संतोष, विनायक, गणेश, व दिलीप यांचे विरुद्ध सांगोला पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद दाखल केली असून पुढील तपास सांगोला पोलीस करीत आहे.

# आमदार निधीच्या वाटपाला हायकोर्टाकडून स्थगिती

## शिंदे-फडणवीस सरकारला मोठा झटका



✔ सुराज्य/मुंबई

**राज्यातील सत्तासंघर्षाच्या सर्वोच्च न्यायालयातील निकालाकडे डोळे लावून बसलेल्या शिंदे-फडणवीस सरकारला मुंबई उच्च न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. उच्च न्यायालयाने आमदार निधीच्या वाटपाला स्थगिती देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे न्यायालयाचा पुढील आदेश येईपर्यंत २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठीचे निधीवाटप राज्य सरकारला करता येणार नाही. तसेच यापूर्वी निधी वाटपात केलेल्या घाईबद्दल न्यायालयाने राज्य सरकारकडून स्पष्टीकरणही मागवले आहे. उच्च न्यायालयाचा हा आदेश शिंदे-फडणवीस सरकारसाठी झटका मानला जात आहे.**

काही दिवसांपूर्वीच काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी सरकार पडण्याच्या भीतीने मंत्रालयातील फाईल्स पटापट मंजूर केल्या जात असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर यांनी निधीवाटपच्या मुद्द्यावरुन उच्च न्यायालयात धाव घेतली होती. २०२२-२३ चे निधीवाटप रद्द करण्याची आणि याचिका प्रलंबित असेपर्यंत या निधीवाटपाला अंतरिम स्थगिती देण्याची मागणी त्यांनी केली होती. या प्रकरणाच्या सुनावणीवेळी उच्च न्यायालयाने काही गंभीर निरीक्षणे नोंदवत राज्य सरकारकडून करण्यात आलेल्या आमदारांच्या निधीवाटपाबाबत प्रश्न उपस्थित केले.

पायाभूत सुविधांसाठी आमदारांना मिळणाऱ्या स्थानिक विकास निधीच्या वाटपासंदर्भात याचिका प्रलंबित असताना गेल्या महिन्याभरात सरकारने १०० टक्के निधी वाटपाची घाई केली. प्रथमदर्शनी पाहता या सगळ्यात काहीतरी गडबड दिसते, अशी टिप्पणी न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आर. एन. लड्ढा यांच्या खंडपीठाकडून करण्यात आली. न्यायालयाने सरकारी वकिलांना आमदारांच्या निधीवाटपातील तफावतीबाबत विचारणा केली. त्यावर सरकारी वकिलांनी हे सर्व आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा आरोप केला.

या प्रकरणाच्या मागील सुनावणीपासून आतापर्यंत १०० टक्के विकास निधीचे घाईघाईने वाटप करण्यात आले. तेव्हाच्या याचिका प्रलंबित असताना सरकारने निधी वाटपासाठी इतकी घाई का केली? पायाभूत सुविधांचा विकास आणि मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी या निधीचे आमदारांना वाटप करण्यात येते. त्यामुळे सरकारकडून कागदावर काहीही माहिती देण्यात येईल. परंतु, आम्हाला वस्तुस्थिती जाणून घ्यायची आहे. त्यामुळे सुनावणीदरम्यान उपस्थित केलेल्या मुद्यांवर प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्टीकरण देण्याचे निर्देश न्यायालयाने राज्य सरकारला दिले. महाविकास आघाडीकडून कायमच राज्य सरकार निधीवाटपात दुजाभाव असल्याचा आरोप केला जातो. आता उच्च न्यायालयाच्या स्थगितीमुळे विरोधी पक्षाच्या या दाव्याला आणखीनच बळकटी मिळाली आहे. त्यामुळे आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावर काय स्पष्टीकरण देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

---

# संयोगिताराजेंना मंदिरात वेदोक्त मंत्र म्हणण्यास विरोध

## आव्हाड संतापले, ‘म्हणाले, सनातनी मनुवाद्यांचा माजोरडेपणा!’

✔ सुराज्य/मुंबई

**संभाजीराजे छत्रपती यांच्या पत्नी संयोगिताराजे नाशिकच्या काळाराम मंदिरात गेल्या असता पूजा करताना तेथील पुजाऱ्याने वेदोक्त मंत्राऐवजी, पुराणोक्त मंत्र म्हटले. या साऱ्या प्रकारावर संयोगिताराजे संतापल्या. त्यांनी तेथील पुजाऱ्याला झापलं. ज्यांच्यामुळे ही मंदिरं वाचली, त्यांच्या घराण्यातील लोकांनाही वेदोक्त मंत्राचा अधिकार नाही काय? असा सवाल त्यांनी तेथील पुजाऱ्याला विचारला. या प्रकरणी राजकीय वर्तुळातून विविध प्रतिक्रिया समोर येऊ लागल्या आहेत.**



राष्ट्रवादीचे नेते, माजी मंत्री जितेंद्र आव्हाड यांनी घडलेल्या घटनेचा धिक्कार केलाय. ‘काळाराम मंदिराच्या सनातनी मनुवाद्यांचा माजोरडेपणा’ अशा शब्दात आव्हाडांनी संताप व्यक्त केलाय.

छत्रपती घराण्याच्या संयोगीताराजे यांच्या पुजेवेळी वेदोक्त मंत्राऐवजी, पुराणोक्त मंत्र म्हटले. छत्रपती शिवरायांबरोबर सनातनी मनुवादी असेच वागले. छत्रपती संभाजी महाराजांना हीच वागणूक दिली. शाहू महाराजांना हेच सनातन मनुवादी शुद्र म्हणाले. हेच सनातनी आजही छत्रपतींना शुद्र समजतात. बरं झालं हे छत्रपतींच्या वारसांबरोबर झालं...अशा संतप्त भावना जितेंद्र आव्हाड यांनी ट्विटद्वारे व्यक्त केल्यात.

# सहाय्यक निबंधकाला लाच घेताना अटक

## महिनाभरापूर्वीच स्वीकारला होता कार्यभार

✔ सुराज्य/नाशिक



सिन्नर सहकारी संस्थांच्या सहाय्यक निबंधकपदी महिनाभरापूर्वीपर्यंत एकनाथ प्रताप पाटील हा कारभार पाहत होता. मात्र, २ मार्च रोजी त्यालाही लाच स्वीकारताना अटक करण्यात आली. त्याच्यावर कारवाई झाल्याने या कार्यालयाचा अतिरिक्त सहाय्यक निबंधक कार्यभार रणजित पाटील याच्याकडे सोपविण्यात आला होता. मात्र, एकनाथ पाटील याच्यापुढे जात रणजित पाटील याने थेट २० लाखांची लाच स्वीकारून सर्वांनाच चक्रावून सोडले.

विशेष म्हणजे आठ वर्षांपूर्वीच २०१५ मध्ये नियुक्ती मिळालेल्या ३२ वर्षीय रणजित पाटीलवर लाचखोरीमुळे कारवाईला सामोरे जावे लागले आहे. त्याच्या घरात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दीड लाख रुपयांची रोकड आढळली आहे. पाटीलसह त्याचा संशयित साथीदार प्रदीप वीरनारायणला पाठलाग करून पकडण्यात आल्याची माहिती एसीबीच्या अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांनी गुरुवारी दिली. न्यायालयाने दोघांना एक एप्रिलपर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# कापूस उत्पादक संकटात; मिळेल त्या भावात विक्रीची वेळ

✔ सुराज्य/फुलंब्री

**मागील वर्षीच्या तुलनेत यंदाही कापसाला चांगला भाव मिळेल, अशी आशा ठेवून अनेक शेतकऱ्यांनी घरीच कापूस भरून ठेवला. मात्र, कापसाचे भाव वाढायचे सोडून भाव दिवसेंदिवस कमी होत आहेत. आणखी भाव कमी होईल म्हणून आर्थिक अडचणीत सापडलेल्या अनेक शेतकऱ्यांनी कापूस विक्रीकरिता काढला आहे. शेतमालाला भाव व शेतमाल उत्पादनाकरिता लावलेला खर्च निघत नसल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे. मिळेल त्या भावात सध्या शेतकरी कापूस विक्री करताना दिसून येत आहे.**



फुलंब्री तालुक्यात कापूस, मका, सोयाबीन, हरभरा, गहू, मिरची, आद्रक, तूर ही पिके प्रामुख्याने घेतली जातात. मागील वर्षी कापसाला भाव चांगला मिळाला होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी यंदा ही बऱ्यापैकी कापसाची लागवड केली. मात्र, यावर्षी कापसाला पाहिजे तसा भाव मिळाला नाही. कापसाचे भाव पुन्हा वाढतील या आशेने शेतकऱ्यांनी घरात कापूस भरून ठेवला होता. सुरुवातीला कापूस नऊ हजाराच्या जवळ पास गेला होता आता कापसाला सात हजार सातशे रुपये भाव होता. परत दिवसागणिक त्याच कापसाचे भाव शंभर रुपयांनी कमी अधिक होत आहे. मुलांचे शिक्षण, शेतीसाठी घेतलेले कर्ज, मुला मुलींचे लग्न या सर्व कामांकरिता पैशांची गरज भासते.

कापूस विकला गेलाच नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे नाईलाजाने शेतकऱ्यांनी घरात भरलेला कापूस विकायला काढला आहे. अतिवृष्टी, परतीच्या पावसाने झालेले नुकसान, कापूस वेचणीसाठी झालेला खर्च, खते, बियाणे, कीटकनाशकांची फवारणी, मशागत, मेहनत या सर्व बाबींचा विचार करता अपेक्षित भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांचे नुकसानच होत आहे. त्यामुळे सर्वच बाबी पाहता शेतकरी विवंचनेत सापडला आहे.

मागील वर्षी अतिवृष्टी झाली. त्यानंतर पिकांवर किडीचा प्रादुर्भाव झाला. शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सध्या कापसाला मिळत असलेल्या भावातून पिकांवर केलेला खर्चही निघत नसल्याने शेतकऱ्यांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे.

# भाषण सुरु करण्यापूर्वीच काढता जलील पाय घेतला

✔ सुराज्य/छ. संभाजीनगर



छ. संभाजीनगरमध्ये रामनवमी काही तासांवर असताना दोन गटांत मोठा राडा झाल्याचं पाहायला मिळालं. यावेळी पोलिसांची ८-१० वाहने देखील जाळण्यात आली. दिवसभर हे प्रकरण गाजलं.

राज्यभरातून या प्रकारावर चिंता व्यक्त केली जात असताना, प्रतिक्रिया येत असताना पोलिसांनी एक सभा घेतली. गुरुवारी (३० मार्च) संध्याकाळी पोलिसांनी घेतलेल्या सर्वपक्षीय शांतता समितीच्या बैठकीतही गोंधळच झाला. केंद्रीय मंत्री भागवत कराडांचं भाषण सुरु असताना खासदार इम्तियाज जलील मंचावर आले. भागवत कराडांचे भाषण संपल्यानंतर जलील बोलणार होते, मात्र जलील बोलण्याआधीच सभागृहात मोठा गोंधळ झाला. जोरदार घोषणाबाजी करत बहुतांश सदस्यांनी सभागृह सोडलं,त्यामुळे जलीलांना भाषण करण्याची संधी मिळाली नाही.

## बेलेश्वर मंदिराच्या विहिरीत कोसळून ३५ भाविकांचा मृत्यू

✔ सुराज्य/इंदौर : मध्यप्रदेशाच्या इंदूरमध्ये बेलेश्वर मंदिरात रामनवमीचा उत्सव सुरू होता. त्यावेळी या मंदिरात असलेल्या पुरातन विहिरींचं छत कोसळून अनेक भाविक या विहिरीत पडले. या घटनेत आत्तापर्यंत ३५ भाविकांचा मृत्यू झाला आहे.

एनडीआरएफनंतर आता लष्कराने या ठिकाणी मदत आणि बचावकार्य हाती घेतलं आहे. रात्री उशिरा या विहिरीतून २१ मृतदेह बाहेर काढण्यात आले. गुरुवारी रामनवमीचा उत्सव सुरू असताना सकाळी ११.३० च्या सुमारास ही दुर्घटना घडली. या घटनेबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींनींही शोक व्यक्त केला आहे.

# पुन्हा दंगली झाल्यास राऊतांवर गुन्हा दाखल करावा : बावनकुळे

✔ सुराज्य/पुणे

**छत्रपती संभाजीनगरमध्ये ज्या दंगली झाल्या त्या सरकार पुरस्कृत होत्या आणि मविआची सभा होऊ नये म्हणून हे सर्व कटकारस्थान सरकराने रचल्याचा आरोप खासदार संजय राऊत यांनी केला होता. राऊतांच्या या वक्तव्याने जर पुन्हा दंगली झाल्या तर त्यांच्यावर दंगलीचा गुन्हा दाखल करावा, अशी भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मागणी केली आहे. त्यांनी हे सुद्धा म्हटले की, ‘२ एप्रिलला होणाऱ्या सभेत खैरे-राऊतांनी भाषण केल्यास शहरातील वातावरण पुन्हा बिघडू शकते, असा जोरदार हल्लाबोलसुद्धा त्यांनी केला.’**



संजय राऊत यांचे छत्रपती संभाजीनगर दंगलीप्रकरणी केलेले वक्तव्य पुन्हा एकदा चिथावणी देण्यासारखे आहे. यापूर्वी देखील राज्यात दंगली घडल्या तेव्हा आम्ही विरोधी पक्षात असताना राऊतांसासरखे बेताल वक्तव्य केले नाही. त्यामुळे छत्रपती संभाजीनगरात यापुढे जर पुन्हा दंगली घडल्या तर संजय राऊत यांना गुन्हेगार करा, असे मत भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मागणी केली आहे.

त्यांनी सांगितले की, ‘महाविकास आघाडीने छत्रपती संभाजीनगरमध्ये त्यांची सभा घ्यावी, मात्र या सभेत संजय राऊत यांनी जर भडकाऊ भाषण केले तर मविआची सभा कशी होईल हे मला माहिती नाही. परंतु त्या ठिकाणी संजय राऊत आणि चंद्रकांत खैरै यांच्यासारख्या वाचाळवीरांमुळे वातावरण बिघडू शकते. त्यामुळे महाविकास आघाडीने सामाजिक सलोखा निर्माण करत सभा घ्यावी, अशी मागणी चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे.’

छत्रपती संभाजीनगरमध्ये २ एप्रिलला महाविकास आघाडीची सभा होणार आहे. ती सभा होऊ नये किंवा कायदा सुव्यवस्थेच्या कारणाखाली त्या सभेला परवानगी मिळू नये, यासाठी शिंदे-फडणवीस सरकारने दंगल घडवण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला.

# सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी; आता निवृत्तीचे वय ६० वर्षे

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**चंदीगडमधील २०,००० हून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. केंद्रशासित प्रदेशाचे प्रशासक बनवारीलाल पुरोहित यांनी चंदीगडमध्ये लागू होणाऱ्या केंद्रीय सेवा नियमांची अधिसूचना जारी केली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, ही अधिसूचना जारी झाल्यानंतर आता केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६० वर्षे होणार आहे. तसेच वेतनश्रेणी आणि डीएमध्ये केंद्रीय कर्मचाऱ्यांप्रमाणेच शिक्षकांना दरमहा सुमारे ४००० रुपयांपर्यंत प्रवास भत्ता मिळणार आहे. शाळांमध्ये आता उपमुख्याध्यापक हे पदसुद्धा असणार आहे. तसेच सेवाज्येष्ठतेच्या आधारे त्यांची नियुक्ती केली जाणार आहे. महिला कर्मचाऱ्यांना बालसंगोपनासाठी दोन वर्षांची रजा मिळणार आहे. इयत्ता १२ पर्यंतच्या दोन मुलांच्या पालकांना शिक्षण भत्ता मिळेल.



## मनिष सिसोदिया यांचा जामीन अर्ज फेटाळला

✔ सुराज्य/नवी दिल्ली : आपचे नेते आणि दिल्लीचे माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदियांना लिकर पॉलिसी केस प्रकरणी जामीन नाकारला आहे. दिल्लीच्या विशेष न्यायालयाने हा जामीन नाकारला असून मनिष सिसोदिया आता त्याला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान देणार आहेत. दिल्लीतील लिकर पॉलिसी संबंधात भ्रष्टाचाराचा आरोप झाल्याचं सांगत सीबीआयने या प्रकरणी आपचे नेते आणि माजी उपमुख्यमंत्री मनिष सिसोदियांना अटक केली आहे. दिल्लीच्या विशेष न्यायालयाने त्यांना ३ एप्रिलपर्यंत कोठडी सुनावली होती. त्यानंतर मनिष सिसोदिया यांनी जामीनासाठी अर्ज केला होता. आज त्यांचा जामीन अर्ज फेटाळण्यात आला आहे.

# इतक्यात निवडणुकीची घाई कशाला?

## अजितदादांनी वडेट्टीवारांना झापले

✔ सुराज्य/पुणे

**पुणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश बापट यांचे नुकतेच निधन झाले. पुण्यातील सर्वपक्षीय नेत्यांशी सौहार्दाचे संबंध असलेले गिरीश बापट हे अजातशत्रू राजकारणी म्हणून ओळखले जात होते. त्यांच्या निधनामुळे पुणे लोकसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी अद्याप वर्षभराचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे पुणे लोकसभा मतदारसंघात पोटनिवडणूक लागण्याची शक्यता आहे. या जागेवर काँग्रेस पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी आत्तापासूनच दावा सांगायला सुरुवात केली आहे. कसबा पेठ पोटनिवडणुकीत काँग्रेसच्या रवींद्र धंगेकर यांनी ऐतिहासिक असा विजय मिळवला होता. त्यामुळे काँग्रेस पक्षाचा उत्साह दुणावला आहे. अशातच काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी पुणे लोकसभा मतदारसंघातून पोटनिवडणूक लढण्याची इच्छा व्यक्त केली होती. या वक्तव्यावरुन विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी विजय वडेट्टीवार यांना फटकारले आहे.**



अजित पवार हे शुक्रवारी गिरीश बापट यांच्या कुटुंबीयांच्या सांत्वनासाठी शनिवारी पेठेतील त्यांच्या घरी गेले होते. गिरीश बापट यांचे निधन झाले त्यादिवशी अजित पवार नाशिकमध्ये होते. त्यामुळे ते बापटांच्या अंत्यविधीला येऊ शकले नव्हते. त्यामुळे शुक्रवारी सकाळी अजित पवार यांनी बापट कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

यावेळी अजित पवार यांना विजय वडेट्टीवार यांनी पुण्यातून लोकसभेची निवडणूक लढवण्याच्या केलेल्या वक्तव्याविषयी विचारण्यात आले. यावर अजित पवार यांनी वडेट्टीवार यांना खडसावले. अजित पवार यांनी म्हटले की, ’हे बघा, लगेच कुणी गुडघ्याला बाशिंग बांधायची गरज नाही. अजून गिरीश बापट जाऊन फक्त तिसरा दिवस आहे. एवढी कसली घाई आहे? माणसुकी वगैरे प्रकार आहे की नाही? काही परंपरा महाराष्ट्राची आहे की नाही. लोक काय म्हणतील यांना जनाची नाही तर मनाची तरी आहे की नाही, असे अजित पवार यांनी म्हटले.’

यावेळी अजित पवार यांनी शिवसेना नेते नरेश म्हस्के यांनाही सुनावले. महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या निवडणुकीत रोहित पवार यांना पाडण्यासाठी अजित पवार यांनी अनेकांना फोन केले होते, असा दावा नरेश म्हस्के यांनी केला होता. त्याबद्दल विचारणा झाल्यावर अजित पवार म्हणाले की, ’कोण नरेश म्हस्के? मी त्याला ओळखत नाही’, असा पवित्रा घेत अजित पवार यांनी या विषयावर फार बोलणे टाळले.

नरेश म्हस्के यांच्या आरोपाबद्दल रोहित पवार यांनाही विचारण्यात आले. त्यावर रोहित पवार यांनी म्हटले की, ‘नरेश म्हस्के मी त्यांना कधी भेटलो नाही, त्यांच्याबद्दल फारसं ऐकलं नाही. मी फक्त एकच गोष्ट ऐकली आहे की, त्यांना ठाण्याचा नगराध्यक्ष बनवायचं होतं, तेव्हा त्यांच्या पार्टीच्या नेत्याने विरोध केला होता. तेव्हा उद्धव ठाकरे यांच्या हस्तक्षेपामुळे म्हस्के महापौर झाले. पण ज्या नेत्याने त्यांना विरोध केला होता, त्याच्याच पक्षात जाऊन ते आज त्यांची बाजू मांडत आहेत. नरेश म्हस्के यांना क्रिकेट आणि पवार घराणे कधीच कळणार नाही, अशी टिप्पणी रोहित पवार यांनी केली.’

# दोन वेळचे जेवण मिळत नाही

## आई-वडिलांनी संपवले जीवन, गुन्हा दाखल

✔ सुराज्य/नवी दिल्ली

**कोट्यधीश मुलगा मला दोन वेळचे जेवण देऊ शकत नाही, अशी व्यथा एका वडिलांनी मांडली आहे. मन हेलवणारी ही व्यथा सुसाईड नोटमध्ये मांडून ज्येष्ठ नागरिक जोडप्याने आत्महत्या केली आहे. पोलिसांनी मुलगा, सून आणि भाच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.**



माझ्या मुलाकडे ३० कोटींची संपत्ती आहे. पण तो मला दोन वेळचे जेवण देऊ शकत नाही. मी माझ्या लहान मुलाकडे राहत होतो. सहा महिन्यापूर्वी त्याचे निधन झाले. त्याच्या निधनानंतर सुनेने चुकीचे काम करण्यास सुरुवात केली. मी विरोध केला. मला घरातून मारहाण करुन हाकलून दिले. हे सर्व सुसाईड नोटमध्ये लिहिल्यानंतर त्या वयोवृद्ध जोडप्याने स्वतः ला संपवण्यासाठी गोळ्या घेतल्या. गोळ्या घेण्याआधी त्यांनी पोलिसांना कॉल केला होता. पोलीस तत्काळ त्यांच्या घरी गेले. घरी पोहोचताच त्या जोडप्याने पोलिसांच्या हातात सुसाईड नोट दिली. विष घेतल्याने त्या दोघांची प्रकृती ढासळत चालली होती. पोलिसांनी त्यांना रुग्णालयात दाखल केले. तेथे उपचार सुरु असताना त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी चार जणांविरोधात गुन्हा नोंदवला आहे.

# पालिकेच्या १२ संवर्गातील १३६ कर्मचाऱ्यांना मिळणार पदोन्नती

## महापालिका आयुक्तांचा महत्वपूर्ण निर्णय

✔ सुराज्य/सोलापूर



सोलापूर महापालिकेतील १२ संवर्गातील अवेक्षक ते कार्यकारी अभियंता आणि कनिष्ठ श्रेणी लिपिक ते कार्यालय अधीक्षक पर्यंतच्या एकूण १३६ कर्मचाऱ्यांना खाते अंतर्गत पदोन्नती देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी घेतला आहे.

सोलापूर महापालिकेचा आकृतीबंध शासनाकडून दिनांक २८ डिसेंबर २०२१ रोजी मंजूर करण्यात आला. शासन निर्णयानुसार एकूण आस्थापना ४ हजार ६१२ पदांना मंजुरी देण्यात आली. यामध्ये अ - वर्ग ११२, ब - वर्ग २६३ , क वर्ग - १३४२ आणि ड वर्ग - २ हजार ८९५ असे एकूण ४ हजार ६१२ पदांना मंजुरी देण्यात आली. यापैकी अ, ब, क, ड या वर्गातील एकूण १ हजार २७१ पदेही रिक्त आहेत तर ३ हजार ३४१ पदे ही भरलेली आहेत. महापालिकेचे सेवा प्रवेश नियम (आर आर) २०२२ शासनाकडून दि. १५ डिसेंबर २०२२ रोजी मंजूर करण्यात आले. त्यानंतर बिंदू नामावली म्हणजेच रोस्टर गेल्या अनेक वर्षापासून महापालिकेकडून तपासण्यात आले नव्हते. अखेर महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्या माध्यमातून सामान्य प्रशासन विभागाचे प्रमुख लक्ष्मीनारायण दोंतुल यांच्या माध्यमातून पुणे मागासवर्ग कक्ष यांच्याकडून हे रोस्टर तपासून घेण्यात आले.

बिंदू नामावलीनुसार सोलापूर महापालिकेत अ वर्ग - सात संवर्ग व ५५ पदसंख्या तर ब वर्गात १९ संवर्गातील १४९ पदसंख्या , क वर्गात २३ संवर्ग आणि ७१२ पदसंख्या तर ड वर्गातील २ संवर्ग आणि ११० पदसंख्या असे एकूण ५१ संवर्गातील १०२६ पदांचे बिंदू नामावली (रोस्टर) तपासण्यात आले आहे. सोलापूर महापालिकेत पद भरतीसाठी शासनाने ३४० पदांना मान्यता दिली आहे. यामध्ये अ वर्गातील तीन, ब ८८, क - २०९, ड वर्ग - ४० असे एकूण ३४० पदांच्या भरतीस मान्यता दिली आहे.

### पदोन्नतीमुळे पालिकेला आर्थिक फटका नाही



महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी केलेल्या १३६ जणांच्या पदोन्नतीमुळे सोलापूर महापालिकेला कोणत्याही प्रकारचा आर्थिक फटका बसणार नाही. गेल्या अनेक वर्षापासून या पदोन्नती रखडल्या होत्या. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने जम्बो प्रमोशन करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी यापूर्वी पुणे महापालिकेतही अशा प्रकारचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता सोलापूर महापालिकेतही कर्मचाऱ्यांना जम्बो प्रमोशन देऊन न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

### यांना मिळणार पदोन्नती

अवेक्षक ते कार्यकारी अभियंतापर्यंत आणि कनिष्ठ श्रेणी लिपिक ते कार्यालय अधीक्षक पर्यंत एकूण १३६ सेवकांना पदोन्नती देण्यात आली आहे. यामध्ये कार्यकारी अभियंता (स्थापत्य) - २ , उपअभियंता (स्थापत्य) - ५, सहायक अभियंता (स्थापत्य) १५, कार्यकारी अभियंता विद्युत १, सहाय्यक अभियंता (विद्युत) - १, सफाई अधीक्षक २, मुख्य आरोग्य निरीक्षक - ७, आरोग्य निरीक्षक १९, कार्यालय अधीक्षक ६ , वरिष्ठ मुख्य लेखनिक - २९, वरिष्ठ श्रेणी लिपिक - ४७ मेट्रन -२ आदींचा यामध्ये समावेश आहे.

### आठवडाभरात प्रक्रिया सुरू होईल

शासन मान्यतेनुसार सोलापूर महापालिकेतील विविध ३४० पदांची भरती करण्यात येणार आहे. टीसीएस या कंपनीमार्फत ही भरती करण्यात येणार असून त्याचा करार लवकरच करण्यात येणार येईल, आठवडा भरात ही प्रक्रिया सुरू होईल, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

# शिक्षक अनुदान वाटपामुळे जि.प. आवारात शिक्षक, संस्थापकांची गर्दी

- ११३ शाळांना मिळणार वाढीव अनुदान
- १९० तुकड्या अनुदानासाठी पात्र
- त्रुटीच्या पूर्ततेसाठी शिक्षकांची धाव

✔ सुराज्य/सोलापूर



राज्य शासनाने २०१८ नंतर तब्बल २०२३ या नवीन वर्षामध्ये खासगी विनाअनुदानित शाळांना वाढीव अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील जवळपास ११३ शाळा तर १९० तुकड्यांना या वाढीव अनुदानाचा फायदा होणार आहे. परंतु शासनाच्या जाचक अटींमुळे सध्या शिक्षकांसह संस्था चालकांची देखील त्रुटींच्या पूर्ततेसाठी चांगलीच दमछाक होतआहे. या सर्व प्रकारच्या पूर्ततेसाठी शुक्रवार, ३१ मार्च रोजी दिवसभर जि.प. आवारात जिल्हा परिषदेच्या आवारात गर्दी दिसून आली.

राज्य सरकारने राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील वाढीव अनुदानाची यादी जाहीर केली आहे. तरी सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षण विभागाकडून वाढीव अनुदानाचे पत्र मिळवण्यासाठी सध्या सोलापूर जिल्हा परिषदेमध्ये शिक्षक व मुख्याध्यापकांची गर्दी दिसून येत आहे. राज्यासह सोलापूर जिल्ह्यातील अनेक शाळांना अनुदान मिळत असल्यामुळे शिक्षकांच्या चेहऱ्यावर समाधान व्यक्त केले जात आहे. या शाळांना पूर्वी कोणत्याही प्रकारचे अनुदान नव्हते. त्या शाळांना २० टक्के अनुदान मिळाले आहे. तर ज्या शाळांना २० टक्के अनुदान होते त्या शाळांना ४० टक्के अनुदान व ज्या शाळांना ४० टक्के अनुदान होते त्या शाळांना ६० टक्के अनुदान जाहीर करण्यात आले आहे. दरम्यान, शाळांना वाढीव अनुदानाचा टप्पा आता जाहीर झाल्यामुळे संस्थेमध्ये काम करणाऱ्या शिक्षकाकडून सध्या संस्थापक मात्र डोनेशनसाठी तगादा लावत दिवसभर जिल्हा परिषदे जिल्हा परिषदेच्या आवारात चर्चा होत आहे.

### या आहेत वाढीव शाळा व तुकड्या

२० टक्के - ५ वी ते ७ वीच्या शाळा ६, - ८ वी ते १० वीच्या शाळा ६, ४० - टक्के - ५ वी ते ७ वीच्या शाळा २१, - ८ वी १० वीच्या शाळा २१९. २० टक्क्यांवरून ४० टक्के - शाळा १२, तुकड्या ३६, ५ वी ते ७ वीचे वर्ग ३४, तुकड्या ९२, शाळा १६, - वेतन घेत असलेले ४० वरून ६० टक्के, शाळा ३१, तुकड्या ६२. एकूण ११३ शाळा व तुकड्या १९०.

# स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त

## ७ एप्रिलपासून धार्मिक कार्यक्रम

✔ सुराज्य/अक्कलकोट



येथील श्री स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट यांचा १४५ व्या पुण्यतिथी महोत्सव वटवृक्ष देवस्थान च्या वतीने शुक्रवार ७ एप्रिल ते सोमवार १७ एप्रिल २०२३ या दरम्यान धर्मसंकीर्तन कार्यक्रम आयोजित करण्यात आल्याची माहिती देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी दिली.

देवस्थानच्या सभामंटपात दररोज सायं. ४ ते ७.३० पर्यंत धर्मसंकीर्तन कार्यक्रम होणार आहे. ७ एप्रिल शुक्रवार रोजी अर्चना अजय राणे व सहकारी, (पुणे) राजा परांजपे प्रतिष्ठान प्रस्तुत अभंगरंग, ८ एप्रिल रोजी शनिवार मुक्ती कु. अन्वी हैद्राबाद यांचे कलावती स्कुल ऑफ डान्स व म्युझिकल कथ्थक,९ एप्रिल ला रविवारी रसिका व सानिका कुलकर्णी - सोलापूर यांचे भक्ती व सुगम संगीत १० एप्रिल सोमवार ह.भ.प. सुहास वझे - गोवा यांचे शिष्यगण मनस्वी नाईक व सहकारी यांचे चक्रीकिर्तन ११ एप्रिल मंगळवार ह.भ.प. डॉ. रंगनाथ महाराज काकडे - वैराग डॉ.अनघा राजवाडे पुणे यांचे प्रवचन भक्तिसंगीत १२ एप्रिल बुधवार निलिमा जोशी व रविंद्र भास्कर झोपे व सहकारी - अंबरनाथ सुरगंधार प्रस्तुती यांचे भक्तिसंगीत १३ एप्रिल गुरूवार ह. भ.प.डॉ. सविता जयंत मुळे - औरंगाबाद यांचे कीर्तन १४ एप्रिल शुक्रवार विजयालक्ष्मी शिरगांवकर - पुणे विलासराव गणपत कुलकर्णी (संगीत अलंकार) सोलापूर यांचे अभंगवाणी व भक्तिसंगीत १५ एप्रिल शनिवार तृप्ती कुलकर्णी व सहकारी रजत पवार -इंदौर यांचे सुगम संगीत व भक्ती नृत्य १६ एप्रिल रविवार मानसी सचिन अत्रे व सहकारी डोंबीवली यांचे कथ्थक १७ एप्रिल सोमवार ह.भ.प. अंजली कवळे - रोहा यांचे नारदीय कीर्तन होणार आहे. १८ एप्रिल रोजी श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी निमित्त दर्शन, प्रसाद, पालखी सोहळा होणार आहे तर १९ एप्रिल बुधवारी गोपाळकाला दु. ३.०० ते ६.०० वाजेपर्यंत सांगता होणार आहे. रोज पहाटे व सायंकाळी दिनेश मावडीकर, पुणे यांचे सनई चौघडा वादन होणार आहे. १८ एप्रिल रोजी स्वामी पुण्यतिथी साजरी होणार असून त्यानिमित्त 'नित्य अनुष्ठान व धर्मसंकीर्तन' दुपारी नित्य अनुष्ठा ४ ते ५ नामस्मरण (नगरप्रदक्षिणा) ५ ते ६ काकडआरती, अखंड नामविणा सप्ताह (दि. ११ एप्रिल ते १८ एप्रिल अखेर) ८ ते १२ श्री गुरुलिलामृत ग्रंथाचे सामुदायिक पारायण होणार देवस्थानचे विश्वस्त उज्वलाताई सरदेशमुख यांच्या अधिपत्याखाली दुपारी १२ ते ४ भजन सेवा होणार आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त दयानंद हिरेमठ, उज्वलाताई सरदेशमुख, विजय दास, महेश गोगी, संपत शिंदे, ड. प्रदिप गजानन झपके यांनी केले आहे.

# खरेदी करताना मोबाईल पळवला

✔ सोलापूर : अ चोरट्याने भाजी खरेदी करताना एका तरुणाच्या खिशातून मोबाईल चोरून नेल्याची घटना मार्केट यार्ड येथे ४ फेब्रुवारी रोजी सकाळच्या सुमारास घडली. याप्रकरणी व्यंकटेश तिमप्पा भैरे (वय-४२, रा.उत्तर सदर बझार) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पो.कॉ. हे. गंगावणे करीत आहेत.

# बॅगतील रक्कम चोरली

✔ सोलापूर : सराफ कट्टा येथे सोने खरेदी करून दुकानाच्या बाहेर येत असताना पद्मकुमार शांतिनाथ उपाध्ये (वय-६८, रा.शुक्रवार पेठ, सोलापूर) यांनी दुचाकीला अडकवलेली बॅग मधील रक्कम अज्ञात तीन महिलांनी लंपास केली. ही घटना २९ मार्च रोजी विद्यानगर शेळगी येथे घडली. जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास स.पो.नि. पवार हे करीत आहेत.

# विवाहितेचा छळ; पाच जणांवर गुन्हा

✔ सुराज्य/सोलापूर

संशय घेऊन शिवीगाळ करत तू आत्महत्या कर, आम्हाला तुझी गरज नाही, असे म्हणून विवाहितेला दमदाटी करून छळ केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना दि.२९ नोव्हेंबर २०१६ ते आज तागायतपर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली. याप्रकरणी अनुराधा रितेश बागलकोटी (वय-३२, रा.तीर्थरूप अपार्टमेंट, रेल्वे लाईन, सात रस्ता) यांनी फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सासू रेणुका, सासरे शिवानंद, नणंद तनुश्री, आज्जे सासू मीनाक्षी शाबादी,मावस सासू ज्योती बाबानगरे (सर्व.रा.विजयपूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील पोलीस हवालदार पापडे हे करीत आहेत.

# 'जलयुक्त शिवार'चा दुसऱ्या टप्प्यांसाठी १६६ गावांची निवड

### ९ गावांच्या निवडीसाठी फेरतपासणी करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

✔ सुराज्य/सोलापूर

तालुकास्तरीय समितीने शिफारस केलेल्या १६६ गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेचा दुसरा टप्पा राबवण्यात येणार आहे. विभागीय आयुक्तांनी दिलेल्या १७५ गावांचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उर्वरित ९ गावांच्या निवडीबाबत तालुकास्तरीय समितीने फेरतपासणी करून गावांची यादी तयार करावी अशा सुचना जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिल्या

जलयुक्त शिवार योजनेचा दुसरा टप्पाच्या जिल्हास्तरीय सनियंत्रण समितीची बैठक झाली या बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी बोलत होते.या बैठकीस जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, भूजल सर्वेक्षण विभागाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक एम. जे. शेख, जिल्हा जलसंधारण अधिकारी पी. बी. भोसले, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी द. यो. दामा यांच्यासह जिल्ह्यातील विविध उपविभागीय जलसंधारण अधिकारी उपस्थित होते.

जिल्ह्यातील एकूण १ हजार १५७ गावांपैकी ९३३ गावांमध्ये जलयुक्त शिवार योजनेचा पहिला टप्पा पुर्ण झाला आहे. या योजने अंतर्गत कामे झाली असून ती जलपरिपूर्ण असल्याचे कृषि विभागाच्या अहवालावरून निदर्शनास आले आहे. दुसऱ्या टप्पासाठी २२४ गावे निवडीसाठी शिल्लक होती. तालुकास्तरीय समितीच्या बैठक झाली या बैठकीत २२४ पैकी १६६ गावांची शिफारस करण्यात आली. गावांच्या निवडीबाबत या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानुसार १६६ गावांची निवड अंतिम करण्यात आली.

### समितीने शिफारस केलेले तालुका निहाय संख्या

अक्कलकोट, ११, बार्शी १, करमाळा ३, माढा ८, माळशिरस ७०, मंगळवेढा ०, मोहोळ २५, पंढरपूर ४७, सांगोला ०, उत्तर सोलापूर ०, दक्षिण सोलापूर १ अशा एकूण १६६ गावाची निवड झाली आहे.



# सोलापूर शहर भाजप काढणार सावरकर गौरव यात्रा

✔ सुराज्य/सोलापूर

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या स्वातंत्र लढ्यातील कामगिरीचे स्मरण करून देण्यासाठी राज्यभरात ३० मार्चपासून भाजपच्यावतीने सावरकर गौरव यात्रा काढण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर शहर भाजपच्यावतीनेही शहरातील तिन्ही मतदारसंघात सावरकर गौरव यात्रा काढण्यात येणार असल्याची माहिती शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोलापूर शहर मध्यमध्ये २ एप्रिल रोजी, शहर दक्षिण मध्ये ४ एप्रिल रोजी ही सावरकर गौरव यात्रा निघणार आहे. या सावरकर गौरव यात्रेत सावरकरांची मोठी प्रतिमा तसेच रथ असणार आहे. या यात्रेत शेकडो सावरकर प्रेमी तसेच भाजप कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. आमदार विजयकुमार देशमुख हे शहर उत्तर तर शहर दक्षिणमधून निघणाऱ्या गौरव यात्रेचे नेतृत्व आमदार सुभाष देशमुख हे करतील तर शहर मध्य मधून भाजपचे पदाधिकारी या गौरव यात्रेचे नेतृत्व करणार असल्याचे ते म्हणाले. सत्तेसाठी उद्धव ठाकरेंनी हिंदुत्वाचा विचार सोडून दिला आहे हिम्मत असेल तर उद्धव ठाकरे यांनी काँग्रेसबरोबर युती तोडून दाखवावी असे आव्हानही शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांनी दिले. या पत्रकार परिषदेत भाजपचे संघटन सरचिटणीस रुद्रेश बोरामणी, माजी महापौर श्रीकांचना यन्नम आदी उपस्थित होते.




# बोधिसत्व डॉ.आंबेडकर मध्यवर्ती जयंती महामंडळाची बुधवारी बैठक

✔ सुराज्य/सोलापूर



बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती जयंती महामंडळाची बैठक बुधवार दि. ५ एप्रिल २०२३ रोजी सायंकाळी ५ वाजता डॉ. आंबेडकर चौक येथील नॉर्थकोट मैदानालगतच्या नियोजित उद्यान जागेवर होणार असल्याची माहिती अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे आणि माजी नगरसेवक आनंद चंदनशिवे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात येईल. सन २०२२ चा अहवाल सादर करण्यात येणार आहे तसेच वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाचे नियोजन करण्यात येणार आहे, असे सांगण्यात आले.

या बैठकीला आंबेडकर प्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन सचिव केरू जाधव यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेत रॉकी बंगाळे, अजित बनसोडे, मिलिंद प्रक्षाळे, बाबा बाबरे, विनोद वाघमारे, विजयानंद उघडे, शांतीकुमार नागटिळक आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

# संत साहित्याची शाही कायम राहील : दंडवते महाराज

## भंडारकवठे येथे प्रभाते मनी पुस्तकाचे प्रकाशन

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर



आपल्या देशातील अनेक राजांची शाही लोप पावली परंतु संत साहित्याची शाही कायम राहील, असे प्रतिपादन सोलापुरातील दंडवते मठाचे मठाधीपती गुरू भक्ती परायण गोविंदराज दंडवते यांनी केले

भंडारकवठे येथील कला शिक्षक विजय बिज्जरगी यांनी लिहिलेल्या प्रभाते मनी या पुस्तकारचा प्रकाशन समारंभ गुरूवारी साधना कुटी येथे पार पडला. त्याप्रसंगी साधकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ज्येष्ठ लेखिका स्नेहा शिनखेडे व सौ.उमा गोविंदराज दंडवते ह्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

प्रभाते मनी या पुस्तकाचा आधार घेत दंडवते यांनी अर्धातास निरूपण केले. ते पुढे म्हणाले की- प्रभाते मनी, राम चिंतीत जावा, असे समर्थ रामदास स्वामी यांनी म्हटले आहे. मनात जो चांगला विचार येतो, ती प्रभात असते. स्नान, संध्या, पूजा आणि अन्नदान हे भक्तीचे प्रकार आहेत. समर्थांनी मनाचे श्लोक का लिहिले? भगवंताने हा जो नरदेह दिला आहे, त्या देहावर राज्य कोण करतो? तर आपले मन. मन आपल्या ताब्यात राहवे म्हणून समर्थांनी मनाचे श्लोक लिहिले. प्रत्येक जीवाचे कल्याण व्हावे,असे हे समर्थांचे साहित्य आहे. आपण संतांचा जयजयकार का करतो? त्यांनी देहावरील दश इंद्रियांवर विजय मिळवला आहे, हे या प्रश्नाचे उत्तर असेल. अध्यात्मात सुखाचा मार्ग आहे.संतांचे विचार नुसते ऐकून चालणार नाही तर ते आचरणात आणले पाहिजेत तर जीवनात बदल होईल, अन्यथा नाही.

शिनखेडे यावेळी बोलताना म्हणाल्या,प्रभाते मनी हे पुस्तक आजच्या मुलांना मार्गदर्शक ठरेल.आज मुलांवरील संस्कारांविषयी नेहमीच चिंता व्यक्त केली जाते. मुलांवर धाक असावा पण भीतीचे संस्कार असू नयेत.आज डिजिटलचा जमाना असला तरी पुस्तक हे लिहिलेच पाहिजे. माझे गुरू द.भिं.कुलकर्णी म्हणायचे की, पुस्तके हे अष्टपुत्राप्रमाणे असतात. त्यामुळे बिज्जरगी यांचे हे आठवे पुस्तक असल्याने प्रभाते मनी या पुस्तकाला अष्टपुत्रच म्हणावे लागेल. प्रारंभी साने गुरूजी कथामालेचे जिल्हाध्यक्ष अशोक खानापुरे यांच्या हस्ते समर्थ रामदास स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. दैनिक सुराज्यचे वृत्त संपादक पुरूषोत्तम कुलकर्णी यांनी प्रास्तविक केले. स्वागत बिज्जरगी यांनी केले. वडापूरचे अरूण पाटील, डॉ.चिंतामणी चौधरी यांनीही मनोगत व्यक्त केले. सोयायटीच्या उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बाळू मैंदर्गी यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन विकास शिळळे यांनी मानले. समारंभाला सरपंच चिदानंद कोटगोंडे, विठ्ठल पाटील, वसंत पाटील, माजी सरपंच रमेश पाटील,गोपाल जंगलगी, सोलापूरचे अरूण धुमाळ, अशोक म्हमाणे आदी मान्यवर उपस्थित होते.

### आनंदवनला देणगी देणार

प्रभाते मनी पुस्तकाच्या विक्रीतून जी रक्कम येईल, ती डॉ.प्रकाश आमटे यांच्या आनंदवन संस्थेला देणगी म्हणून देण्याचा मनोदय बिज्जरगी यांनी व्यक्त केला. आनंदवन येथे वंचित व पिडीत मुलांचे संगोपन केले जाते.

